म. ग्रं. सं. ठाणें
विषय
वा. नं.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
वा. नं. २०२

काव्य ७८४

संग्रा - वि० स० सुखठणकर
मुंबई पु. अं. कोल्हटकर
१९२९ - पृ. ११८

१९५३४

१८५३४
मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. काव्य नं. १०५९
ता. ..........
ठाणें.

# वासंती

## प्रार्थना

कवि–कै. **गोविंद वासुदेव कानीटकर.**

(टागोरच्या गीतावरून)

अन्तर मम विकसित करिं । हे परात्परा ! ॥ धृ० ॥

निर्मल करिं, उज्ज्वल करिं । जागृत करिं, उद्धत करिं
निर्भय करिं, मंगल करिं । हृदयभास्करा ॥ १ ॥

करिं निरलस निःसंशय । करिं रे करिं शुद्धाशय
करिं हें मन निर्विषय । जीवितेश्वरा ॥ २ ॥

दे सज्जनसंग सतत । षड्विकारसंघमुक्त
करिं करिं सत्कर्मनिरत । हे शुभंकरा ॥ ३ ॥

छंद तुझा रात्रंदिन । लागो त्वच्चरणीं मन
करिं करिं मच्चित्तशमन । शांतिसागरा ! ॥ ४ ॥

(**नवयुग**)

---

# सरस्वतीची भूपाळी

कवि-कै. **गोविंद**

नमनें वाहुनि स्तवनें उधळा, जयजयकार करा ॥
बंधु हो ॥ जयजयकार करा ॥
सकल मनांचा विकास येतो आज आपल्या घरा ॥ धृ० ॥
विमलहास्यसुमवृष्टीमध्यें असो तुझें स्वागत ॥
निरंतर ॥ असो तुझें स्वागत ॥
परमात्म्याच्या चित्सौंदर्या, येई बा हांसत ॥ १ ॥
आत्मवेलिच्या स्फूर्तिफुलांवर वसंत जे विकसती ॥
बुद्धिचे ॥ वसंत जे विकसती ॥
त्याच वसंता, तदिय विकासा, सरस्वती बोलती ॥ २ ॥
हे वाग्देवी, असे प्रार्थना ये या संकीर्तना ॥
उत्सवा ॥ ये या संकीर्तना ॥
जगन्मंगले, सकल मंगलांसह दे पददर्शना ॥ ३ ॥
सगुण शांत त्वच्चित्रमूर्तिला गातों मी गायन ॥
शारदे ॥ गातों मी गायन ॥
धन्य धन्य सौंदर्य, धन्य त्वत्प्रसन्न पुण्यानन ॥४ ॥
किरिट शोभला त्वन्मौलाला अमूल्य तत्वांचा ॥
शारदे ॥ अमूल्य तत्वांचा ॥
अरुण राग त्यांतून उधळला सद्गुणरत्नांचा ॥ ५ ॥
डोले कंठीं सच्छास्त्रांचा चंद्रहार हांसरा ॥
पाहुनी ॥ चंद्रहार हांसरा ॥
भालीं फुलला, गालीं खुलला काव्य दिव्य विजवरा ॥ ६ ॥

सौंदर्याहुनि दिव्य दिव्यतर हिचें ज्ञान सुंदर ॥
खरोखर ॥ हिचें ज्ञान सुंदर ॥
त्या ज्ञानाहुन जगांत सुंदर एकच परमेश्वर ॥ ७ ॥
हृदयमंदिरीं प्राणशक्तिचे झोंपाळे डोलवी ॥
देवि ही ॥ झोंपाळे डोलवी ॥
सुखदुःखाचे देउनि झोंके जीवांना खेळवी ॥ ८ ॥
विचारकारंजावर तुषार शब्दांचे नाचवी ॥
देवि ही ॥ शब्दांचे नाचवी ॥
जीवात्मा त्यांतून बोलवी परमात्मा डोलवी ॥ ९ ॥

( **गोविंद—गीत.** )

---

# शारदे !

कविः— **चंद्रशेखर.**

जातीच्या सुमनापरी धवल जें, सद्गंध जें कोंवळें,
दर्भाच्याच तुऱ्यापरी शुचि तसें अत्यंत जें सोंवळें,
लोहाळ्यासम नीट जें, तरि तुला वाटेल तैसें वळे,
लोहातुल्य दुजांस, चुंबकगुणें तूतेंच जें आकळे;
जें हंसासम उंच उंच गगनीं वातांतुनी पोहलें,
यानांतोनि सुकल्पनामय महा—मेरूस आरोहलें,
माघारें गरुडापरी उतरुनी नीडांत जें राहिलें,
तें माझें मन शारदेस तुजला प्रेमेंच मी वाहिलें.
प्रेमानंद जया मनीं समरसे त्या काव्यमोदासवें
त्यायोगें नयनांमधूनि गळती मोत्यें न तीं आंसवें,

पाणीदार, अमोल, दुर्मिळ अशीं तीं चौगुणीं गुंफिलीं,
ज्या स्नेहाळ मनें ममत्व धरुनी देवींस तूंतें दिलीं;
प्रेमी सोज्ज्वल, तें उदात्त मन, जें वेडें तुझ्याकारणें,
त्याचीं सर्वहि ईप्सितें पुरवुनी त्वां फेडणें पारणें.

( मनोरंजन. )

# प्रियकर हिंदिस्तान !

कविः—प० वा० **नारायण वामन टिळक.**

प्रियकर हिंदिस्तान !
अमुचा प्रियकर हिंदिस्तान !
हा अलंकार हो भूगोलाचा ! यास नसे उपमान ! ॥
सर्व सुखाची खाण
अमुच्या सर्व सुखाची खाण !
हें अभिमानाचें सौभाग्याचें अमुच्या रम्य निधान ! ॥
हे जन्मभूमि ! हें तनमनधन घे तुला ! ॥
तव उपकारांना न मिळे कोठें तुला ! ॥
हें फिटणें साध्य न आह्मां अतिदुर्बलां ! ॥
सुखकर तव गे ध्यान !
निरंतर सुखकर तव गे ध्यान !
जो जननीचा जो जनकाचा तोच तुझाही मान ! ॥

( **टिळकांची कविता.** )

# चांफा

कविः—Bee

चांफा बोलेना, चांफा चालेना,
चांफा खंत करी, कांहीं केल्या फुलेना ॥ धृ० ॥

गेलें अंब्याच्या वनीं
म्हटलीं मैनांसवें गाणीं
आम्ही गळ्यांत गळे मिळवून ॥ चांफा० ॥

गेलें केतकीच्या वनीं
गंध दर्वळला वनीं
नागासवें गळालें देहभान ॥ चांफा० ॥

आलें माळ सारा हिंडून
हुंबर पशूंसवें घालून
कोलाहलानें गलबलें रान ॥ चांफा० ॥

कडा धिप्पाड वेढी
घाली उड्यांवर उडी
नदी गर्जून करी विहरण ॥ चांफा० ॥

मेघ धरूं धांवे
वीज चटकन् लवे
गडगडाट करी दारुण ॥ चांफा० ॥

लागुनि कळिकेच्या अंगा

वायु घाली धांगडधिंगा
विसरुनी जगाचें जगपण ॥ चांफा० ॥

सृष्टि सांगे खुणा
आह्मां मुखस्तंभ राणा
मुळीं आवडेना ! रे आवडेना ! ॥ चांफा० ॥

चल येरे येरे गड्या
नाचूं उडूं घालूं फुगड्या
खेळूं झिम्मा झिम्–पोरी झिम्–पोरी झिम् ! ॥ चांफा० ॥

हें विश्वाचें आंगण
आह्मां दिलें आहे आंदण
उणें करूं आपण दोघेजण ॥ चांफा० ॥

जन विषयाचे किडे
यांची धांव बाह्याकडे
आपण करूं शुद्ध रसपान ॥ चांफा० ॥

'दिठीं दीठ' जातां मिळून
गात्रें गेलीं पांगळुन
अंगीं रोमांच आले थरथरून ॥ चांफा० ॥

चांफा फुलीं आला फुलून
तेजीं दिशा गेल्या आटुन
कोण मी–चांफा ? कोठें दोघेजण ? ॥ चांफा० ॥

(मनोरंजन)

# श्रीमहाराष्ट्रगीत

कविः—कै. **गोविंदाग्रज.**

मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा ।
प्रणाम घ्यावा, माझा हा श्रीमहाराष्ट्रदेशा ॥ धृ० ॥
राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा ।
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा ॥
अंजन कांचन करवंदीच्या कांटेरी देशा ॥
बकुल फुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा ॥
भावभक्तिच्या देशा, आणिक बुद्धीच्या देशा ।
शाहीरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा ।
ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी
नाचतें करीं
जोडी इहपर लोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासि वैराग्यासी
जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा ॥
प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्रदेशा ॥ १ ॥
अपरसिंधुच्या भव्य बांधवा ! महाराष्ट्रदेशा ।
सह्याद्रीच्या सख्या ! जिवलगा ! महाराष्ट्रदेशा ॥
पाषाणाच्या देहीं वरिसी तूं हिरव्या वेषा ।
गोदा, कृष्णा, भीमा तुझिया ललाटिंच्या रेषा ॥

तुझिया देहीं करी प्रतिष्ठा प्रथम प्राणांची ।
मंगल वसती जनस्थानिंची श्रीरघुनाथांची ।
ध्येय जें तुझ्या अंतरीं० ॥ २ ॥

( वाग्वैजयंती )

---

# हतभागिनी.

कविः—कै. **विनायक.**

( **चालः**—कधिं करिती लग्न० )

तळहातीं टेकुनी ही स्वशिरातें बैसली ! ॥ धृ० ॥
मस्तकीं केश विखुरले,
श्वास चालले अश्रु लोटले,
गळे जल गालीं—चिंतेनें पोळली !
वस्त्रें तीं अपुरीं जुनीं,
तेथ कोठुनी असावा मणी,
दीनता ल्याली—दुःखानें कावली !
दारिद्र्य, घरीं जागतें,
अन्न काय तें, दिसेना कुठें,
वायुजलवाली—गगनाची सांवुली.
होती ती सिंहासनीं,
भाग्यशालिनी, धनी विजयिनी,
परी तिज खालीं—दुर्दैवें ओढिली. ४

एकाश्रुबिंदुकारणें,
तियेच्या रणें, झुंजले मनें,
असे सुत व्याली—जयकालीं माउली.
कारटीं करंटीं तिथें,
निपजलीं भुतें ! मातृशोणितें—
स्वतांला लाली—आणाया धांवलीं ।
कल्याण काय नेणती,
नित्य भांडती, आपसांत तीं,
परां वश झालीं—स्वत्वाला विसरलीं !
गेले दिन यावे कसे,
वर्तनें असे, एकदां फसे—
गाय जी गाळीं—चेंपत ती चालली !

(**विनायकाची कविता.**)

---

# शिवराजदर्शन

कविः- कै. **विनायक.**

[**चाल**—उद्यां वघ जातें० ]

गडावर जाऊं । शिवराजदर्शना लाहूं ॥ धृ० ॥
भुललों पूर्व विसरलों सारें,
अंगीं भरलें नूतन वारें,
मूर्खत्वाचे तुटती तारे,
सत्य तें पाहूं. १

आली नयनांवर अंधारी,
न दिसे न कळे स्वकर दुपारीं,
सहजच भिस्त परांवर सारी,
स्वरूपा पावूं. २
खान पराचें, पान पराचें,
भान ज्ञान स्थान पराचें,
उरलें अंतीं काय स्वतांचें,
शोधना धांवूं. ३
परतेचा दृढ घेरा पडला,
स्वभाव त्यायोगें अवघडला,
चिंताभृंग मनाला जडला,
घालवूं बाऊ. ४
सद्‌गुरुविना सोय न दुसरी,
व्यसनसागरीं ती एक तरी,
निर्भय पैल तडीला उतरी,
चला त्या ध्याऊं. ५
आमचा गुरु श्रीशिवराणा,
पुनरुज्जीवन हेतु पुराणा,
महाराष्ट्रवीर्याचा बाणा,
संकटीं बाहूं. ६
देह तयाचा जीव, तयाचा,
नेत्र श्रवण तयाची वाचा,

सर्व तयाचें, ज्याचें त्याच्या,
कारणीं लावूं. ७
घालूं लोटांगण तच्चरणीं,
पाहूं रूप तयाचें नयनीं,
लावूं जीव तद्‌गुणश्रवणीं,
तद्यशा गाऊं. ८

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. काव्य नं. ७७४
ता.

**( विनायकाची कविता. )**

# तारकांचें गाणें

कविः—कै. **बालकवि.**

कुणि नाहीं ग कुणि नाहीं । आह्माला पाहत बाई ॥
शांति दाटली चोंहिकडे । या ग आतां पुढें पुढें ॥
लाजत लाजत । हळूच हांसत ॥
खेळ गडे खेळूं कांहीं । कोणीही पाहत नाहीं ॥ १ ॥
सुंदर तें तें नटवून । कोमल तें तें खुलवून ॥
प्रेमाच्या वसतीकरतां । जग सगळें फुलवूं आतां ॥
दिव्य स्वांनीं । गाणीं गावुनि ॥
विश्वाला निजवायाला । वाऱ्याचा बनवूं झोला ॥ २ ॥
फेकुनि द्या इकडेतिकडे । थोडेसे दंवबिंदु गडे ॥
या निर्मल अवकाशांत । प्रेमाचें पेरूं शेत ॥
मंदयामिनी—। सर्वें गुंगुनी ॥
झोंप लागली जगताला । या ग आतां खेळुं चला ॥ ३ ॥

सरितांच्या लहरींवरती । नाचूंया निर्भय चित्तीं ॥
अर्धोन्मीलित फुलवोनी । लपूं चला कलिकांत कुणी ॥
कविहृदयांत । गिरक्या घेत ॥
जाउनियां खेळूं आतां । हीं गाणीं गातां गातां ॥ ४ ॥

( बालकवींची कविता. )

---

# प्रबोधन

कविः—कै. रेंदाळकर.

उघडिं नयन ! रम्य उषा हंसत हंसत आली !
अरुणकिरणमय वसना अवनी ही ल्याली ॥ धृ० ॥
मंजु मधुर गान करित
आनंदें भुवन भरित,
विहगवृंद गगनिं उडत
या सुरम्य कालीं !
उघडिं नयन रम्य उषा हंसत हंसत आली !
हंसति फुलें, तरु डुलती,
लतिकागण नृत्य करिति,
धांवति या भ्रमरतती
सुप्ति तुला आली !
उघडिं नयन रम्य उषा हंसत हंसत आली !

सुप्रभात सुखकर हा
दारुण तिमिरोत्कर हा
रमवी सकलांस पहा
दिव्य विभवशाली !
उघडीं नयन रम्य उषा हंसत हंसत आली !

(मनोरंजन.)

---

## घड्याळ

कविः—कै. **केशवसुत**

गडबड घाई जगांत चाले,
आळस डुलक्या देतो पण; ॥
गंभीरपणें घड्याळ बोले—
'आला क्षण—गेला क्षण !' ॥
घड्याळास या नाहीं घाई,
विसावाहि तो नाहीं; ॥
त्याचें म्हणणें ध्यानीं घेई—
'आला क्षण—गेला क्षण !' ॥
कर्तव्या जे तत्पर त्यांचें
दृढ नियमित व्हावयास मन, ॥
घड्याळ बोले अपुल्या वाचे—
'आला क्षण—गेला क्षण ! !' ॥

कर्तव्याला विमुख आळशी
त्यांच्या हृदयीं हाणित घण, ॥,
काळ ऐक ! गातो अपुल्याशीं
'आला क्षण—गेला क्षण !' ॥
वार्धक्य जर सौख्यांत जावया ॥
व्हावें, पश्चात्ताप नुरुनियां, ॥
तर तरुणा रे ! मला वाटतें,
ध्यानीं संतत अपुल्या आण ॥
घड्याळ जें हें अविरत वदतें—
'आला क्षण—गेला क्षण !' ॥

(केशवसुतांची कविता.)

---

## विद्यार्थ्यांप्रत

कवि :—कै. केशवसुत.

महत्त्व भारी आहे या पृथ्वीचें, ।
त्याहुनि अतिशय या सगळ्या विश्वाचें; ॥
परि तुजमध्यें महतीचें जें बीज ।
त्याहुनि कांहीं मोठी नाहीं चीज; ॥
ठसव मनीं हें साचें ।
बाबा ! हें वच बहु मोलाचें ॥ १ ॥
अग्नि असे हा तेजस्वी रे फार,
त्याहुनि भारी सूर्य नभींचा थोर; ॥

परी किरण जो तुजमध्यें सत्याचा !
प्रकाश सर्वोत्तम तो आहे त्याचा; ॥
घोकं सदा हें वाचे,
बाबा ! हें वच बहु मोलाचें ॥ २ ॥
पृथ्वीमध्यें रत्नें बहु आहेत, ।
आकाशीं तर असंख्य दिसताहेत; ॥
परि एक रत्न तुजमध्यें जें सच्छील ।
कोणाला नच सर त्याची येईल,
स्मरण असूं दे याचें ।
बाबा ! हें वच बहु मोलाचें ॥ ३ ॥
स्नायूंमध्यें पुष्कळ आहे शक्ति, ।
नृपवेत्रीं तर फारच आहे म्हणती; ॥
परि एक एक जो नवा शब्द तूं शिकसी ।
शक्ति तयाची उलथिल सर्व जगासी ! ॥
पठन तर करीं त्याचें ।
बाबा ! जग हें बदलायाचें ॥ ४ ॥

( खेळगडी )

---

# माउली

कविः-**भास्कर रामचंद्र तांबे.**

निजल्या तान्ह्यावरी
माउली दृष्टि सारखी धरी !
तिचा कलीजा पदरीं निजला
जिवापलिकडे जपे त्याजला
कुरवाळुनि चिमण्या राजाला
चुंबी वरचेवरी ॥
सटवाई जोखाई हंसविति
खळीं गोड गालांवरि पडती
त्याचीं स्वप्नें बघुनि मधुर तीं
कौतुकते अंतरीं ॥
अशीच असशिल त्रिभुवनजननी !
बघत झोंपल्या मज का वरुनी !
सुखदुःखांचीं स्वप्नें बघुनी
कौतुकशी कां खरी ?

(तांबे यांची कविता.)

---

# आनंदी-आनंद

कविः-कै. **बालकवि.**

[ १ ]

आनंदी आनंद गडे !
इकडे तिकडे चोंहिकडे
वरती खालीं मोद भरे;
वायूसंगें मोद भरे;
नभांत भरला,
दिशांत फिरला,
जगांत उरला,
मोद विहरतो चोंहिकडे
आनंदी आनंद गडे !

ता. ........ नं. ........
ता. ........

[ २ ]
सूर्यकिरण सोनेरी हे
कौमुदि ही हंसते आहे,
खुलली संध्या प्रेमानें,
आनंदें गाते गाणें;
मेघ रंगले,
चित्त दंगलें
गान स्फुरलें,
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

[ ३ ]
वाहति निर्झर मंदगती,
डोलति लतिका वृक्षतती,
पक्षि मनोहर कूजित रे
कोणाला गातात बरें ?
कमल विसकलें,
भ्रमर गुंगले,
डोलत वदले
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

[ ४ ]
स्वार्थाच्या बाजारांत
किती पामरें रडतात;
त्यांना मोद कसा मिळतो
सोडुनि स्वार्था तो जातो
द्वेष संपला,
मत्सर गेला
आतां उरला
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी आनंद गडे !

( **मनोरंजन** )

---

# महाराचा पोर

कविः—कै. **पांडुरंग बाळकृष्ण दडकर.**

( **चाल**—वीरा भ्रमरा० )

“ अश्रुपात हा कशास करिसी काढुन रडसी गळा ?
बालका ! सांग वृत्त तव मला. ॥ १ ॥
जिकडे तिकडे आनंदाचा पूर लोटला असे !
दिवाळी दुःखद तुज हें कसें ? ॥ २ ॥

आज सकाळीं स्नानें करुनी पक्वान्नें सेविलीं !
सर्व हीं गोड मुखें जाहलीं ॥ ३ ॥
पेठेमध्यें दीपोत्सव किति थाटानें चालला ।
सांग कां बससी येथें मुला ? ॥ ४ ॥
श्वान, अश्व हे स्वामीसौख्यें आनंदी जाहले ।
धन्यांसह राजपथें चालले ॥ ५ ॥
दुर्दैवानें कमाल केली ? हृदय तुझें लासलें ! ।
वाटतें कोणी मृत जाहलें ! " ॥ ६ ॥
यत्न करी बोलण्या बाल तो शब्द फुटेना मुळीं ।
हुंदके लागति त्याच्या गळीं ॥ ७ ॥
प्रेमाचें वच नव्हतें पूर्वीं ठावें त्याला कधीं !
त्यामुळें शांति भरे तद्हृदीं ॥ ८ ॥
दीनवदन तो बालक बोले—' तात मला हो नसे ।
माय ती वृद्ध घरीं मम वसे. ॥ ९ ॥
आज दिवाळी; म्हणुनी आला थोर मुलांचा थवा ।
बघाया नगरीं दीपोत्सवा ॥ १० ॥
मीहीं आलों सोडुन माझी माता गांवीं घरीं ।
चाललों बाळांमागुन दुरी ॥ ११ ॥
महार माझी जात असे हो शिवेल कोणी मला ।
यास्तव घालिं जपत पावलां ॥ १२ ॥
नाचत खेळत सर्व संवगडी आनंदें चालले ।
'दूर हो शिवशिल !' मज बोलले ॥ १३ ॥
अधोवदन परि पेठेमध्यें अनुसरलों मी तयां ।
जाहला हर्ष मना माझिया ॥ १४ ॥

मौज पाहुनी दंग जाहलों महार हें ना स्मरे ।
ब्राह्मणा शिवलों चुकुनी करें ॥ १५ ॥
' महारडा हा अंध दांडगा ! ' वदलीं त्यातें मुलें ।
' आपुले भिजवा कपडे जलें ! ' ॥ १६ ॥
क्रोधें डोळे लाल करोनि फिरला ब्राह्मण तदा ।
बळानें मारी अपुली गदा ॥ १७ ॥
माझ्या खेड्यांतील मुलें तीं हंसावया लागलीं, ।
बोललीं ' खोड भली मोडली ! ' ॥ १८ ॥
तेथुन आलों लपत छपत मी निर्जन याहो स्थलीं ।
ना पुन्हां जाइन तेथें मुळीं ॥ १९ ॥
क्षमा करा हो ! क्षमा करा ! ! मी बालबुद्धि अंतरीं ।
इच्छितों बघण्या इतरांपरी ! " ॥ २० ॥
श्रवण चाललें असतां हें मम नेत्र अश्रु ढाळती ।
मम हृदिं दुःखें शत दाटती ॥ २१ ॥
ईश्वरनिर्मित प्रेमांकुर -जो मानवहृदिं उगवला ।
चुंबवी बालकगालां मला ॥ २२ ॥

( नवयुग )

---

# पांखरा ! येशिल का परतून ?

कविः—प. वा. **नारायण वामन टिळक.**

पांखरा ! येशिल का परतून ?
मत्प्रेमानें दिल्या खुणांतुन
एक तरी अठवून ? पांखरा ! ॥
हवेसवें मिसळल्या माझिया
निःश्वासा वळखून ? पांखरा ! ॥

थांब, घेऊं दे रूप तुझें हें
हृदयीं पूर्ण भरून ! पांखरा !॥
जन्मवरी मजसवें पहा हीं
तव चंचूची खूण ! पांखरा !॥
विसर मला, परि अमर्याद जग
राही नित्य जपून ! पांखरा !॥
ये आतां ! घे शेवटचे हे
अश्रू दोन पिवून ! पांखरा !॥

**( टिळकांची कविता- )**

---

# हा हिन्ददेश माझा

कवि;-**आनंदराव कृष्णाजी टेकाडे.**

आनंदकंद ऐसा । हा हिंददेश माझा.
सत्यासि ठाव देई,
वृत्तीस ठेवी न्यायी,
सत्वासी मानि राजा । हा हिंददेश माझा.
जगदीश जन्म घेई,
पदवीस थोर नेई,
चढवी स्वधर्मसाजा । हा हिंददेश माझा.
जनकादि राजयोगी,
शुक वामदेव त्यागी
घुमवीति कीर्तिवाजा । हा हिंददेश माझा.

दमयंति, जानकी ती
शीलास भूषवीती
नटली नटेश गिरिजा; । हा हिंददेश माझा.
विश्वास मोह घाली
ऐशी मुकुंद मुरली
रमवी जिथें निकुंजा, हा हिंददेश माझा.
गंगा हिमाचलाची
वसती जिथें सदाची,
होऊनि राहि कलिजा । हा हिंददेश माझा.
पृथुराज सिंह* शिवजी,
स्वातंत्र्य वीर गाजी
करिती रणांत मौजा; । हा हिंददेश माझा.
तिलकादि जीव देही
प्रसवूनि धन्य होई,
मरती स्वलोककाजा; हा हिंददेश माझा.
जगिं त्याविना कुणीही
स्मरणीय अन्य नाहीं
थोरांत थोर समजा; । हा हिंददेश माझा.
पूजोनि त्यास जीवें,
वंदोनि प्रेमभावें,
जयनाद हाचि गर्जा । हा हिंददेश माझा.'

———

(आनंद—गीत.)

* (१) राणा प्रतापसिंह.

# महाराष्ट्रास—

कविः—**गजानन त्र्यंबक माडखोलकर.**

पावित्र्याचें मंदिर तूं। जगदुद्धरणीं तव हेतू।
संतकवींची तूं स्फूर्ती। परात्पराची तूं प्रीती।
मांगल्याचा,।
देशभक्तिचा,।
सुरम्यतेचा।
संगम अभिनव हा झाला। महाराष्ट्ररूपा आला. ॥
तुझ्या समर्थांचीं गीतें। गाउं, अम्ही अभिनव चित्तें
अभिनव चित्तें तीं गीतें। गाउं, जागवूं जनतेतें।
तीच जागृती।
देइल अंतीं।
दास्या मुक्ति।
तव यश नइल शिखरातें। गाउं समर्थांचीं गीतें ॥
अभंग तत्त्वें धर्माचीं। अभंग कीर्ती देशाची।
अभंग सेवा भाषेची। अभंग वाणी तुकयाची।
भाव भक्तिचें,।
स्वानंदाचें।
स्थान सुधेचें।
तुझ्या तुक्याचीं हीं गीतें। शांतविती अमुचीं चित्तें ॥
स्वातंत्र्याची तूं भूमी। प्रभु एक तुझा तो स्वामी।
निधान तुझिया प्रेमाचें। नाम तुझ्या शिवरायाचें।

तो तानाजी, ।
माधव, बाजी ।
नाना गाजी ।
सकळ मराठा मेळवला । भगवा झेंडा खेळविला. ॥
जय बोला हो जय बोला । अरुणदेव उदया आला ।
जय जय जय जय जय शब्दें । दुरितांचीं पळवूं अब्दें. ।
दैन्य पळालें ।
विश्व उजळलें ।
नवयुग आलें ।
तुझें गीत गाऊं आम्ही । महाराष्ट्रसेवाधर्मी. ॥
तुझे धीर ते राऊत । महाराष्ट्रसेवक संत ।
अश्रूंचे घातले सडे । म्हणुनि उभें हें पीक पुढें ।
सुधारणेचें ।
जनसेवेचें ।
कार्य तयांचें ।
पूर्णतेस नऊं आम्ही । महाराष्ट्रसेवाधर्मी. ॥

( मातृ-गीतांजलि )

---

## संध्यातारक

कविः—कै. **बालकवि.**

दिनरजनींच्या हृदयावरलें
प्रेमसंगमीं उद्भवलेलें
मुग्ध तान्हुलें फूलच पाहिलें !
कोमल किरणीं, नभ फुलवोनी, खेळ खेळतें त्यांत ॥

लहरींच्या सुंदर आंदोलीं
लहानग्याची शय्या केली,
रजनी ओंव्या गाउं लागली:—

तूं लडिवाळा ! निज निज बाळा ! मातेच्या हृदयांत.

विश्वाचें विश्रांतिस्थान
तें माझ्या गुणिलाचें गान
अशी गडे अक्षय गाईन !

तूं वेल्हाळा ? निज निज बाळा ! मग गीतसुरांत.

तेजाला आन्दोलन देत
मंदपणें विचरे स्वर्वात
शांत शांत अवघ्या गगनांत

दिव्य अप्सरा, सुगुणागारा, प्रीति गीति गातात.

त्या गीतींच्या मधु लहरींनीं
गुंगी चढुनी या तव नयनीं
लागो डोळा तुझा म्हणोनी—

मीही गातें, अस्फुट गीतें, हृदयाच्या हृदयांत.

झोंप कशी ती परि अजुनीही
आज गडे तुज लागत नाहीं ?
सांग करूं तरि आतां काई ?

बघ ना बा रे ! विश्वच सारें; निजलें प्रभुहृदयांत.

आन्दोलीं तुज नीज न येई
घेतें तर उचलुनि मी बाई
झांकियलीं ग मधुनेत्रें हीं,
पदराखालें, झोंपीं गेलें, बाळ कसें इतुक्यांत ?

मराठी मनोरंजन संग्रहालय
दा. नं. ५७२
ता. ..............

## मंजुळा

कवि-**काव्यविहारी**

विस्तीर्ण वडाच्या दगडी पारावरी
मी बसें एकदां चिंतित कांहींतरी
कितितरी वडाच्या पारंब्या लोंबती
या पारंब्यांची गर्दी झाली किती
मंजुळा पोरगी कुणबी जातींतली
बांध्यानें नीटस आणि काळिसांवळी
वय तिचें असावें तेरा चवदा तरी
ती पारंबीच्या खेळे झोल्यावरी
जरतारी पातळ नव्हती ती नेसली
नोहता फुलांचा गजरा वेणीवरी
वर्णही नोहता जरी केतकीपरी
निर्व्याज खुलेपण हीच तिची माधुरी

## वासंती

चरणीला लावुनि पांचचार शेरडें
ती मधुनी मधुनी पाही त्यांच्याकडे
गुणगुणे खेडवळ गाणें कांहींतरी
घे खुशाल झोके हलत्या झोल्यावरी
तिज माहित नव्हते शहरांतिल चोंचले
लाजणें मुरडणें असेल मग कोठलें !
मी नांव तियेचें पुशिलें जेव्हां तिला
खणखणीत सांगे " मज म्हणती मंजुळा "
मग विचारलें मी " तुम्हि भावंडें किती ! "
ती झटकन् सांगे " मी आणि श्रीपती "
शेतांत श्रीपती गेला राखायला
आणिलीं शेरडें मी हीं चारायला
बोलुनी एवढें झोंके चढवायला
नेटानें लागे-भान नुरे मग तिला
ती खुल्या दिल्यानें झोंके घे मंजुळा
सानंद कौतुकें बघत उभा मी तिला
तिज काय वाटलें न कळे परि थांबली
निमिषांत उतरली झोल्यावरुनी तळीं
क्षणभरी मजकडे निर्हेतुक पाहुनी
मंजुळा पळाली क्षणार्धांत तेथुनी
मजपुढुनी गेली भरकन् वाऱ्यापरी

शेरडांत मिसळुनि जाई निघुनी दुरी
त्या खुलेपणांतलि आठवीत माधुरी
मी किती वेळ तरि बसलों पारावरी
तीं निर्भय वृत्ती निर्हेतुक पाहणें
तें गोड खुलेंपण आमुच्यामध्यें उणें
येतसे स्वतःचें कृत्रिम जीवित मनीं
कष्टलों परतलों घरास मग तेथुनी
हा प्रसंग घडुनी किति वर्षें लोटलीं
भंवताली सारी कृत्रिमता माजली
परि मधुनी मधुनी आठवते ती मला
खेड्यांतिल साधी आणि गोड मंजुळा.

(सुगी)

---

# बोलत कां नाहीं ?

कविः–कै. दत्त.

**चाल**—कृष्ण गडी आपुला०

बोलत कां नाहीं, झालें काय तुला बाई !
चोळी परकर नवीन केले,
दागदागिने सर्व घातले,
चूल बोळकें जवळ मांडिलें,
दिलें सर्व कांहीं, तरी तूं बोलत कां नाहीं ? १
आई तुजला रागें भरली ?
कीं दादानें खोडी केली ?
रुसली माझी बाळ सोनुली,
काय करूं बाई, गडे तूं बोलत कां नाहीं ?
सांग तुला कां भूक लागली !
देउं काय मी लाटुनि पोळी ?
रुसूं नको, घे ही वघ झाली
छकुले ! ये खा हीं, गडे ! तूं बोलत कां नाहीं ?
शेजारिण वेणुचा बाहुला,
नवरा तुजला आज पाहिला,
म्हणुनि लाजुनि धरिशि अबोला ?
ओळखलें बाई, नको तूं सांगुं नको कांहीं !

**( दत्तांची कविता. )**

---

# शाहणी बाहुली

(चाल—ला बाईला०)

या बाई या, बघा बघा कशि माझि बसलि बया;
ऐकूं न येतें, हळुहळु अशि माझि छबि बोलते. १
डोळे फिर्विते, टुलु टुलु कशि माझि सोनि बघते २
बघा बघा तें, गुलुगुलु गालांतच कशि हंसते ३
मला वाटतें, इला बाइ सारें कांहिं सारें कळतें. ४
सदा खेळते, कधिं हट धरुन न मागे भलतें. ५
शहाणि कशी, साडिचोळि नवि ठेवि जशिच्या तशी. ६

(दत्तांची कविता.)

---

# जळदेवतेचें गाणें

कविः-**कुवलयानंद.**

जो जो जळ बाळा। वेल्हाळा।
निज निज निज रे विमला॥ धृ०॥
पुष्पलता डोले। मंदगती।
तेणें कुसुमें हलती।
त्या कुसुमांमाजी घे झोले।
स्वच्छन्दानें लोळे॥ जो जो—॥ १॥
गजगतिनें चाले। गृहदेवी।
कुंभ कटीवरि ठेवी।

त्या कुंभामाजी । घे झोले ।
स्वच्छन्दानें लोळे ॥ जो जो—॥ २ ॥
गगनीं पवनानें । हळु हलती ।
नवमेघांच्या पंक्ती ॥
त्या मेघांमाजी । घे झोले ।
स्वच्छन्दानें लोळे ॥ जो जो—॥ ३ ॥
रविशशी दोहिंकडे । गगनीं ही ।
हलविति पृथिवी पाहीं ॥
त्या पृथिवीवरती । घे झोले !
स्वच्छन्दानें लोळे ॥ जो जो—॥ ४ ॥

( **कुवलयानंदाचीं गाणीं** )

---

# अनुचर

कविः—**भालचंद्र**

शिवराजे निजधामा गेले !
भग्नहृदय जन अवघे झाले !
राष्ट्र अश्रुंनीं साचें न्हालें
परी एकटा अश्रु न ढाळित बावरुनि बघतो !
—कुत्रा त्यांचा तो ! ॥ १ ॥
धाय मोकलित रथारूढ तें
पुण्यश्लोकाचें शव करितां,
हंबरडा फोडी ती जनता !

परी एकटा दुःख न करतां रथीं उडी घेतो !
—कुत्रा त्यांचा तो ! ॥ २ ॥
विशालाकृति भिसाळ ढवळा !
श्वानकेसरी नरकेसरीचा
ऐसा जो जगताला गमला !
साचा अनुचर छत्रपतीचा ! सवें रथीं चढतो !
—कुत्रा त्यांचा तो ! ॥ ३ ॥
स्वारी शेवटली हाले ती !
भगवा झेंडा हत्ती पुढती !
सहस्र हयगज त्यामागूती !
'धडड' सलामी भांडीं देती ! परी उगी बघतो !
—कुत्रा एकचि तो ! ॥ ४ ॥
स्वारी शेवटली येतां ती
श्रीजगदीश्वरदेउळापुढती
धाय मोकलित रथाखालती
शिवरायाचें शव घेती, तैं उडी खालिं घेतो !
—कुत्रा त्यांचा तो ॥ ५ ॥
शय्या शेवटली ती होती
चंदनकाष्ठाची, ती वरती
हंबरडा फोडित जनता ती
शव ठेवुनिं, त्या अग्नी देतां, आंत उडी घेतो !
—कुत्रा त्यांचा तो ! ॥ ६ ॥

शिवराजे निजधामा गेले
राष्ट्र अश्रुंनीं साचें न्हालें !
भग्नहृदय जन अवघे झाले !
परी एकटा एकनिष्ठ तो त्यांच्यासह जातो
—कुत्रा त्यांचा तो ! ॥ ७ ॥
त्यांच्यासह जाउनियां, होई
समाधिस्थ त्यांच्याजवळी ही !
त्यांच्यासह पूज्यपदा घेई !
एकनिष्ठतागुणेंचि ऐसा श्रेष्ठ पदीं वसतो
—कुत्रा केवळ तो ! ॥ ८ ॥

[ **नवयुग.** ]

---

# अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस

कविः—कै. **गोविंदाग्रज.**

[ मध्यरात्रीच्या सुमारास कोकिळेचा शब्द, विषण्ण व निराश हृदयाला किती सांत्वनपर वाटतो, याची सुखनिद्रित मनाला साक्ष पटणार नाहीं. ]

अवेळ तरिही बोल—कोकिळे—अवेळ तरिही बोल !
रात्र पसरली जगतावरती,
भुरके काळे मेघहि फिरती,
वारा वाहे भरभर भंवतीं,
बालचंद्रचांद्रिका घाबरी गोरीमोरी होत;

उदासीनता छाया पसरी,
सृष्टि दिसे जरि वरुनी हंसरी—
खिन्नताच तरि अंतरिं सारी,
व्यर्थ बोलतो, व्यर्थ डोलतो संसाराचा गोल !
आनंदाच्या प्रातःकाळीं,
दिवसाच्या गजबजल्या वेळीं,
किंवा संध्या जेव्हां नटली,
आनंदाचीं गाणीं गाया गवई लाखकरोड !
असतां आनंदाची माया,
वृद्धि क्षणभर तिची कराया
लागे त्याचा तोच गावया,
आनंदाला द्विगुणित करिती आनंदाचे बोल !
परंतु जेथें उदासीनता
व्याकुल करिते विषण्णचित्ता,
तेथें त्याला द्याया समता—
गाणें गावें, हेंच अलौकिक ईश्वरतेचें काम !
दूर कराया उदासीनता
गाच गडे ! अंगाई गीता,
झोंप येऊंदे माझ्या चित्ता,
लक्ष लागतें सुरांकडे तव; वाटती ते बिनमोल !

(वाग्वैजयंति)

# शिपाइदादा नका !

कविः-आनंदतनय.

[ चालः-क्षणभंगुर संसार. ]

शिपाइदादा नका ॥ नका हो० ॥
नेऊं नका हो माझ्या दादा बाइच तलि आइका ॥ धृ०
मालुं नका त्या धका, नका हो० ॥
ओढुं नका ना असे फलफला, कालपूनचा भुका ! ॥
नका उगाळूं बुका, नका हो० ॥
काय असें हें तली कलितसां पडल गटालीं फुका ॥
देउं का दोडका तुह्मांला, देऊं का दोड० ॥
चुका देऊं कीं, चिलिम भलाया देऊं जलासा सुका ? ॥
कां बघतां टकमकां, असे हो, कां बघतां० ॥
काय पाहिजे तली तुह्माला देऊं का हा लुका ? ॥
काय असें बोलतां, असें हो काय तली बोलतां ? ॥
चोली केली दादानें ती पोटासाठीं न का ?
भाकल नव्हती घलीं, खली हो, भाकल० ॥
कापुनशानी मळ्यामधोनी उलिसा अनिला मका ! ॥
चिलडी नव्हती मला, खली हो, चिलडी० ॥
नई आनिली, दिला लुका हा ध्याया हो भातुका ! ॥
सोडा सोडा जला, तयाला सोडा० ॥
धेऊं द्या त्या जातां जातां माझा साकलमुका ! ॥

---

[ हृदयतरंग. ]

# फत्तर आणि फुलें

कविः—**केशवकुमार.**

होता डोंगरपायथ्यास पडला धोंडा भला थोरला;
वर्षें कैकहि लोटलीं तरि न तो हाले मुळीं आपुला !
आनंदी फुलवेल एक जवळी होती सुखें राहत;
बाळें सांजसकाळ हांसत तिचीं तैशींच कोमेजत !
थट्टेखोर फुलें हंसूनि वदलीं धोंड्यास तीं एकदां
" धोंडा केवळ तूं ! अरे, न जगतीं कांहीं तुझा फायदा "
संतापूनि तयांस फत्तर म्हणे " कां हीं वृथा बोलणीं ?
सारी सुंदरता इथेंच तुमची जाईल रे वाळुनी ! "
धोंड्याच्या परि काळजास भिडले ते शब्द जाऊनियां;
काळा ठिक्कर यामुळें हळुहळू तो लागला व्हावया.
पुष्पांच्या कवळ्या मनांतहि सले तें फत्तराचें वच;
गेली तोंडकळा सुकून पडलीं तीं पांढरीं फारच !
कोणी त्या स्थळीं शिल्पकार मग तो ये हिंडतां हिंडतां,
त्याच्या स्फूर्तिस फत्तरांत दिसली कांहीं तरी दिव्यता;
त्याची दिव्यकळाकरांगुलि न ज़ों त्या फत्तरा लागली !
श्रीसौंदर्यमनोरमा प्रगटुनी साक्षात् उभी राहिली !
वेडापीर असाच गुंगत कुणी एकाकि ये त्या स्थळा
ती मूर्ती बघतांच तो तर खुळा नाचावया लागला !

त्यानें तीं खुडुनी फुलें भरभरा पायीं तिच्या वाहिलीं,
तों त्यांची फुलुनी कळी खदखदां सारीं हंसूं लागलीं !

*　　*　　*

लावण्याकृति ती वनांत अजुनी आहे उभी हांसत,
पुष्पेंही वसलींत तीं बिलगुनी पायीं तिच्या खेळत.

( मनोरंजन. )

---

# परवशतापाश

कविः–वामन गोपाळ जोशी.

परवशतापाश दैवें ज्यांच्या गळां लागला ॥
साजिवपणीं घडती सारे ।
मरणभोग त्याला ॥ धृ० ॥
असुनि खास मालक घरचा
म्हणाति चोर त्याला ॥ १ ॥
सौख्यभोग इतरां सारे
कष्ट मात्र त्याला ॥ २ ॥
मातृभूमि त्याची त्याला ।
होत वंदिशाला ॥ ३ ॥

( रणदुंदुभी )

---

# तान्हें रोप

लहानसें होतें बीज
आंत तयाच्या घे नीज
बाळ चिमुकलें तें तान्हें
सृष्टीचें गोजिरवाणें !
पाळण्यांत झोले घेई
रजनी त्या गाणें गाई ! १

प्रभात होतां रवि बोले
"पहा ! तान्हुल्या ! जग खेळे !
ऊठ पाळणा तूं सोड
जगताशीं मैत्री जोड
शुभ्र रुपेरी तेजांत
ऊठ बैस गाणीं गात !" २

मोत्यांचा पाउस पडला
बाळाला उठवायाला !
दंव बिंदूंच्या स्पर्शानें
पुलकित झालें तें तान्हें !
वरती मग आपोआप
आलें तें तान्हें रोप ! ३

बघतां तें गोजिरवाणें
फुलली सृष्टी हर्षानें
रवि खेळे वारा नाचे
पल्लव गळले वृक्षांचे
सर्व बोलले बाळाला
हो तूं पुढतीं वृक्ष भला !" ४

( मोत्यांची माळ )

# मी तुझी मावशी तुला न्यावया आलें !

कवयित्रीः-श्री० **लक्ष्मीबाई टिळक.**

ही भरली घागर तुझ्या शिरावर बाळे !
तूं उभी; लागले कुठें कुठें तव डोळे ?
ही गाडी वाजे खडखड खडखड दूर
हें इकडे उडतें धडधड तवही ऊर !
तूं प्रसन्न आतां, क्षणें खिन्न तूं होशी,
मेघांत गवसला चंद्रच दुसरा दिसशी !
तूं अल्लड साधी पोर ! लाडके,
गुरुजनें कल्पिली थोर ! लाडके
हे दोन दिवस तरि टळो, म्हणोनी झालें
मन अधीर, गेलें माहेरा तव गेलें !
माहेरीं आपण भाऊबिजेला जाऊं,
हें प्रौढपणाचें ओझें फेंकुन देऊं !
सुचतील तेवढे खेळ खेळुनी घेऊं !
ही मनांत तुझिया बाई । वासना
मी ओळखलें का नाहीं ? । सांग ना !
भर बघूं पुन्हां अश्रूंही । लोचना
ये हांसत आतां आलिंगी मज बाळे
मी तुझी मावशी तुला न्यावया आलें !

(**मनोरंजन**)

---

# सप्तरंगी इंद्रधनुष्य

कविः-अच्युत श्रीधर भांडारकर.

हिरवीं शेतें, हिरवीं कुरणें
गुरें मेंढरें संथपणें
चरती तेथें
वरती येथें
वृक्षाखालीं मीं बसलों
डोंगर चढुनी बहु श्रमलों.
झुळझुळ वारा वाहत येई
गती तयाची वाढत जाई
करडे, काळे
मेघ निघाले
नील नभाला भरण्याला,
गर्जत वृष्टी करण्याला.
झिमझिम थेंबें पाउस आला
द्रुततर मग तो पडूं लागला,
वीज चकाके,
घेती झोंके,
वायूवेगें वृक्षतती,
वनबाहू कम्पित होती.
क्षणोक्षणीं त्या दाट वनीं
कडकड गडगड फुटत ध्वनी
कड्यादर्‍यांतुनि
द्विगुणित परतुनि
मम कर्णांवर आदळतें—
अतुल भयानक वादळ तें.
वारा थकला, पाऊस सरला,
नद्याझर्‍यांतुनि प्रवाह भरला
सुंदर मोतीं
टिपटिप गळती,
सुवर्णकिरणें प्रकाशती
पर्णांच्या चंचल ज्योती.
इंद्रधनू हें आकाशीं
पसरवी सुंदरता खाशी
हिरवे पिंवळे
लाल जांभळे
रंग मिसळले; खग गाती;
त्या ऐक्याची जणुं स्तुति.
प्रभो दयामय परमेशा !
संसारांतिल बहु क्लेशां
सोशिन मी जर
शेवट सुंदर
होइल त्यांचा यासारिखा,
लाभुनि अंतीं गोड सुखा !

(नवयुग.)

# भीमकबाळा

कविः—कै. गोविंदाग्रज.

( चाल-यादवराया भाई याहो—ही )

भीमकबाळा ती वेल्हाळा टाकुनि गोपाळा ।
निश्चय केला बंधुवरानें द्यावी शिशुपाळा ॥
विवाहकाळीं खळ तो आला तंव राजसबाळा ।
शोकभरानें विव्हळ झाली, दोष्र देइ भाळा ॥
" अर्जुनि तरी या दासीसाठीं या हो गोपाळा ।
काळवेळ ही जवळी आली संकट हें टाळा ॥
ऐन समयिं कां निष्ठुर झालां ? काय असें केलें ?
दीनांवरचें प्रेम सदाचें आज कुठें लपलें ?
कधिं पाहिनसें झालें मजला सांवळीं ती काया ।
कधिं वाहिन ही काया माझी देवा तव पायां ॥
कधीं सांठविन रूप मनोहर या नयनीं देवा ।
मिळेल केव्हां अभागिनीला प्रेमाचा ठेवा ॥
नका करूं छळ याहुनि माझा अजुनी घननीळा ।
वाट बघूं किती घेउनि हातीं अश्रूंची माळा ? ॥
किती आळवूं परोपरीनें ? कंठ किं हो सुकला ।
तरी यावया अजुनी माझा माधव कां चुकला ? ॥
सर्व साक्षि भगवंता ! आतां अंत नका पाहूं ।
कीं विषपानें प्राण तरी हा पदकमला वाहूं ॥

मीच अभागी म्हणुनी आपण अजुनी नच आलां ।
ब्रह्म सगुण जें दुर्लभ सकळां; मिळे कसें मजला ?” ॥
रडतां यापरि अश्रुजलानें पदर भिजुनि बाई ।
ऊर भरुनि ये—शब्द न चाले—कवन विरुनि जाई ॥ १ ॥

( **वाग्वैजयंति.** )

---

# निरोप द्यावा आतां

कविः—कै. **गोविंदाग्रज.**

निरोप द्यावा आतां । बाळा । टाकुनि जाते माता ॥ धृ० ॥
माझें माझें म्हणुनि आजवर जें लेणें ल्यालें ।
बाळ गुणाचें, हाय ! कुणाचें आज परी तें झालें ॥ १ ॥
हे तारांनों, उचंबळूं द्या करुणारसरंगा ।
अखंड वाहो नवतेजाच्या पुण्याईची गंगा ॥ २ ॥
घटकेचा संसार संपला, लटका ठाव ठिकाणा ।
वनदेवींनों पदरीं घ्या हा माझा राजसराणा ॥ ३ ॥
अनाथ दुबळा देह पडे हा आई नाहीं त्याला ।
फुलत्या फुलवंतीची यावर मायापांखर घाला ॥ ४ ॥
भुतें जागतां उठतां दचकुनि हृदयींचा हा ठेवा ।
काळ्या रातीं जित्या फुलांचा खडा पाहरा ठेवा ॥ ५ ॥
कळतें तुम्हां सारें कांहीं, अहां फुलांच्या माता ।
लोभ असूंद्या इथून पुढतीं नाहीं बोलत आतां ॥ ६ ॥

( **वाग्वैजयंति.** )

---

# सृष्टीची करमणुकीची घटिका

कविः—प. वा. **नारायण वामन टिळक.**

वसन्त ज्या म्हणती । सकल जन वसन्त ज्या ह्मणती ॥
ती सकल सृष्टिची करमणुकीची घडी मला दिसती ! ॥
नवीं नवीं येती । पांखरें नवीं नवीं येती ॥
हीं फुलें उधळिती कुणी नभांतुन जणुं वाऱ्यावरती ! ॥

तरुवल्ली दिसती नवाभरणमंडिता ॥
ये स्फूर्ति पिकादिक गानकलापंडितां ! ॥
वनिं करमणुकीस्तव जमती वनदेवता ॥

हर्षा नाहिं मिती । खरोखर हर्षा नाहिं मिती ! ॥
हे कपोत, केकी नर्तन करिती, ताल झरे धरिती ! ॥
नवीं फुलें फुलती । वसन्तीं नवीं फुलें फुलती ॥
जणुं तारे उतरून करमणुकीस्तव धरणीवर येती !

यजमान निमंत्रित जनीं जसा वावरे ॥
हा मंद सुगंधित वायु तसा संचरे, ॥
इतरांस सौख्य जें तें याचें सुख खरें ! ॥

भ्रमर मला म्हणती । मुदित हे भ्रमर मला म्हणती ॥
ये ! वसन्त आहे तोंवर करुं ये आपण गुणगुण ती ! ॥

# गोजिरवाण्या फुला !

कविः—दत्तात्रय भिमाजी रणदिवे.

सावध ! सावध ! सावध ! माझ्या गोजिरवाण्या फुला !
सुखद तो वसंत रे लोपला !
रिझवित हंसवित, रमवित होता मंगलखानि जो तुला,
लयाला गेला तो निर्मला !

लपंडाव तुजसवें खेळल्या तारा ज्या रजनिला,
न आतां दिसतील त्याही तुला !

फूलपांखरें खरेखुरे तव खेळाडू संवगडी
बापुडे जातिल देशोधडी !

मृदुल मनोहर रविकिरणेंही होतील तुज पारखीं,
जयातें चुंबुनि होशी सुखी !
येईल न कर्णीं पिकवाणी मंजुला !
नच चंद्रिकाहि तुज कुरवाळिल सोज्ज्वला
ती प्रणयमूर्ति भेटेल उषाहि न तुला !

वेढितील खल कुटिल जलदगण जगन्मित्र भानुला;
व्यापिल तिमिर निखिल भूतला ।

हाय ! हाय ! बघ, खडतर कैसे दुर्दिन हे पातले,
गगनही अश्रु गाळुं लागलें !

प्रचंड वातें येइल आतां भूमितला तरुतती !
होइल मग कैशी तव गती ?

प्रसन्न निर्मल सरसावलिही होइल मलिनांतर !
प्रमोदें नाचतील दर्दुर !
कर्दमभयवशमानस धरितिल मराल मानस-दिशा,
नलिनी होतिल वेड्यापिशा !
नभःस्मशानीं भेसुर भारी करील अविरत अतां ।
पिशाची तांडव विद्युल्लता !
हें इंद्रचाप नच, रविकिरणांची चिता !
भुलुं नकोस पाहुनि बा ! त्याची रुचिरता !
लाडक्या ! लयातें जाइल बघतां अतां !
ऐकायाला येतिल भीषण मेघगर्जना तुला,
दचकशिल मधुनि मधुनि कोमला !

( **मनोरंजन.** )

---

# कुलथोरवी

कविः—**नारायण केशव बेहरे.**

तडित् कडाडे, उपजे काळ्या कभिन्न मेघोदरीं
म्हणुनि कां वीज नसे साजिरी ?
खारें पाणी, क्षुद्र शिंपले—जन्माचें साधन
म्हणुनि का मौक्तिकांस मौल्य न ?
महाविषारी असे खरोखर नागाची ती फणी
म्हणुनि कां गरलच वरचा मणी ?

पंकापोटीं जन्म पावुनी सौंदर्यें शोभतें
म्हणुनि कां कमल तुच्छ वाटतें ?
असे कोळसा काळा, हीरक सांगे परि सोयर
म्हणुनि कां धवल न कोहीनुर ?
सुरासुरांनीं भांडण करुनी सागरास मंथिलें
म्हणुनि कां अमृत तें नासलें ?
मूळ पाहतां पहाडांतला लहानसा ओहळ
म्हणुनि कां पूज्य न गंगाजळ ?
शिळा वाळुची मूळ, मूर्ति परि पंढरीस नांदते
म्हणुनि कां भक्ती मंदावते ?
जन्मा येणें दैवाहातीं, करणी जग हांसवी
गाणें व्यर्थचि कुळथोरवी !

( **मनोरंजन** )

---

# आई !

कविः—**यशवंत**

( **चालः**—रसने न राघवाच्वा, **मोरोपंत** )

" आई ! " म्हणोनि कोणी । आईस हांक मारी,
ती हांक येइ कानीं । मज होइ शोककारी
नोहेच हांक मातें । मारी कुणी कुठारी,
आई कुणा म्हणूं मी ? । आई घरीं न दारीं !

ही न्यूनता सुखाची । चित्ता सदा विदारी
स्वामी तिन्ही जगांचा । आईविना भिकारी. १
चारा मुखीं पिलांच्या । चिमणी हळुच देई,
गोठ्यांत वासरांना । ह्या चाटतात गाई
वात्सल्य हें पशूंचें । मी रोजरोज पाहीं
पाहूनि अंतरात्मा । व्याकूळ हाय ! होई
वात्सल्य माउलीचें । आह्मां जगांत नाहीं,
दुर्भाग्य याविना का । आह्मांस नाहिं आई. २
शाळेंतुनी घराला । येतां धरील पोटीं
काढूनि ठेविलेला । घालील घांस ओंठीं
उष्ट्या तशा मुखाच्या । धांवेल चुंबना ती
कोणी तुझ्याविना गे । का ह्या करील गोष्टी ?
तूझ्याविना न कोणी । लावील सांजवाती
सांगेल ना म्हणाया । आह्मां 'शुभंकरोति' ३
आई ! तुझ्याच ठायीं । सामर्थ्य नंदिनीचें
माहेर मंगलाचें । अद्वैत तापसांचें
गांभीर्य सागराचें । औदार्य या धरेचें
नेत्रांत तेज नाचे । त्या शांत चन्द्रिकेचें
वात्सल्य गाढ पोटीं । त्या मेघमंडळाचें
वास्तव्य या गुणांचें । आई तुझ्यांत साचें. ४
येशील तूं घराला । परतूनि केधवां गे
दवडूं नको घडीला । ये ये निघूनि वेगें

हे गुंतले जिवाचे । पायीं तुझ्याच धागे
कर्तव्य माउलीचें । करण्यास येइ वेगें
रुसणार मी न आतां । जरि बोलशील रागें
ये रागवावयाही । परि येइ येइ वेगें. ५

( यशोधन. )

---

# फूलपांखरूं

कविः—**किशोर.**

फूलपांखरूं मजा करी ।
येउनि अमुच्या बागेंत ॥
नाचे, खेळे, भान हरी ! ।
फिरतें हिरव्या गवतांत ! ॥
गुलाब, जाई, शेवंती—।
सर्व तयाला ये म्हणती ! ॥
फूलपांखरूं जरि जाई ।
गंधाचा तें धनि होई ! ॥
चिमणें बालक मजा करी ।
येवोनी ह्या जगतांत ॥
नाचे, खेळे, भान हरी ।
फिरतें तें स्वच्छंदांत ॥
शील, नम्रता, सद्रीती—।
सद्गुण त्याला ये म्हणती ॥

चिमणें बालक जरि जाई ।
कीर्तीचा तें धनि होई ॥

( खेळगडी. )

---

# पांच देवींचा पाळणा

कविः--कै. **गोविंदाग्रज.**

[ हरएक रियासतीच्या राखणीसाठीं कोणतेंतरी एक जागृत दैवत असतें. इंग्रजी वाचकांना माहीत आहेच कीं, इंग्लंडभोंवतीं सेंट जॉर्ज, स्कॉटलंडभोंवतीं सेंट अँड्र्यूज् आणि आयर्लंडभोंवतीं सेंट पॅट्रिक जागल्या डोळ्यांनीं नेहमीं पहारा करीत असतात. मराठेशाहीला अशा पांच देवी सरंक्षक आ--होत्या ! तुळजापुरची तुळजाई, साताऱ्याची मंगळाई, प्रतापगडची भवानी आई, पुण्याची पर्वती आणि पाराची वरदायी, हीं तीं पांच पवित्र नांवें होत ! या देवींनीं शिवनेरीच्या बाळाला निजवण्यासाठीं हा पाळणा श्रीजिजाउसाहेबांच्या मुखानें म्हटलेला आहे. इतिहास कल्पनेनें आधीं पाहण्याची कल्पना रामाकाळची पुराणी आहे, हें सर्वांस ठाऊक आहेच. ]

( **चाल**–अजि अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला० )

गुणि बाळ असा जागसि कां रे वायां ॥
नीज रे नीज शिवराया ॥ धृ० ॥
अपरात्रीचा प्रहर लोटला बाई ॥ तरि डोळा लागत नाहीं ॥
हा चाल़तसे चाळा एकच असला ॥ तिळ उसंत नाहिं जिवाला ॥
निजवायाचा हरला सर्व उपाय ॥ जागाच तरी शिवराय ॥
चालेल जागता चटका ।
हा असाच घटका घटका ।
कुरवाळा किंवा हटका ।

कां कष्टविशी तुझी सांवळी काया ॥ नीज रे नीज शिवराया ॥
ही शांत निजे बारा मावळ थेट ॥ शिवनेरी जुन्नर पेठ ॥
त्या निजल्या ना तशाच घांटाखालीं ॥ कोंकणच्या चवदा ताली ॥
ये भिवबाया वागुल तो बघ वाळा ॥ किति बाई काळा काळा ॥

इकडे हे सिद्दि–जमान
तो तिकडे अफ़जुलखान
पलिकडे मुलुखमैदान

हे आले रे तुजला बाळ धराया ॥ नीज रे नीज शिवराया ! ॥

[ अपूर्ण ] ( **वाग्वैजयंती** )

---

## यापुढें

कविः–कै. **विनायक**

( **चालः**––नृपममता रामावरती )

कोठचा शिवाजी राजा
निजधर्माचा अभिमानी––यापुढें
कोण देशकार्यासाठीं
सोडील स्वहितीं पाणी––यापुढें !
कोठची रामदासाची
बोधाची मधुरा वाणी––यापुढें !
मावळे, जयांनीं दिले, आपले गळे, देशनिर्वाणीं,
नांवही न त्यांचें कानीं––यापुढें !

ग्रंथ सं... नं. ...

निपजणार कोण धनाजी
तारण्या मराठेशाही—यापुढें !
रडवील कोण रणरंगीं
यवनांना धाईधाई—यापुढें
भासून रूप कोणाचें
दचकतील ठायीं ठायीं—यापुढें
राखिलें, राज्य आपलें, असे व्यापिलें जया यवनांहीं—
कोण असा प्रसवे आई—यापुढें २
फांकडा शिपाई बाजी
दापील निजामा कोण—यापुढें !
वारील छत्रसालाचें
सांकडें वीरवर कोण—यापुढें
घालील महाराष्ट्राला
निरभिलाष आळा कोण—यापुढें !
जें शिवें, स्थापिलें नवें, राज्य त्या जवें वाढवी बाजी
सर करील त्याची कोण—यापुढें ! ३
अटकेवर झेंडे न्याया
आणितां कुठून भरारी—यापुढें !
थिजलीच न चालेल पुन्हां
भाऊंची शौर्य-भरारी—यापुढें !
फडनवीस नाना गेले
त्यांची न दिसेल हुषारी—यापुढें !

जी खनी, प्रसवली मणी, यापरी जनीं, बहुगुणी भारी–
झाली ती हाय भिकारी–यापुढें ! ४
ऐश्वर्य लयाला गेलें
जडलें दारिद्र्य कपाळीं—यापुढें !
हास्याचे दिन मावळले
आंसवें लोचनीं आलीं—यापुढें !
मित्र सर्व वैरी झाले
संकटीं न उरला वाली—यापुढें !
यापरी, नाडलों तरी, लोचनांतरीं, नीज जी भरली–
ती निघेल कवण्या काळीं—यापुढें. ५

[ विनायकाची कविता ]

१८५३

---

## —पाळणा—

कविः-**वनवासी.**

[ **चालः**–भूपती खरें तें वैभव. ]

पाळणा हवा मज बाळपणीं जो होता, !
मज शांति देइगा कोण असे त्यापरता ? ॥
पाळणा लहानच रुचतो मजला आई, ।
अति विस्तृत मंदिर दुःखद परि तें होई ! ॥
पाळणीं गोधडी जर्जर जी पांघरली, ।
मज तीच हवी गे, फेंकुन दे या शाली ! ॥

पाळणीं चिमुकल्या चिमण्या तूं लावियल्या, ।
दे त्याच, नको जरि दिल्या कुणी गजशाला ! ॥
पाळणीं येति जे छपरांतुनि कवडासे ! ।
जा, आण धरुनि ते, फुटोत सारे अरसे ! ॥
पाळणीं घालुनी ह्मणसी जी अंगाई, ।
जगिं तीच तिच्यासम ! गा ती माझे आई ! ॥
जो असे शांतिचा दाता । पाळणा, ।
जो हरी सर्व क्लेशांतें । पाळणा
जो गमे स्वर्ग भूलोकीं, । पाळणा, ।
तव हात लागुनी दिव्य पवित्रचि झाला,
तो आण पाळणा ! निजवुनि मग दे झोला ! ॥

( **खेळगडी** )

---

# खचतो माझा धीर ?

कविः—**वनमाळी**

( **चाल**—मशि बोलुं नको रे )

( १ )

हे चिमण्या चंद्रा ! पाहुनि तुजला खचतो माझा धीर !
मुनिनिं कथिलें, सत्य झालें
परि कशा हें भाळिं आलें
हे मोद खेद मज उलविति बाळा ! खळत न नयनीं नीर !

(२)

जन्म दिधला, करिं न धरिला
अजुनि पान्हा जों न फुटला
ये तोंच स्मरणीं आज्ञा ऋषिंची व्रजिं पोंचवि यदुवीर !

(३)

देखिलें ना मुखहि पुरतें !
तोंच दुरवी बालकातें
ती माता कसली, घाता सजली ह्मणतिल अदय अधीर !

(४)

त्यांत माजे तिमिर भारी
वीज मधुनी नभ विदारी
हें अकांडतांडव मांडति नभिंचे घन गर्जुनि गंभीर !

(५)

मुसळधारा कोसळेही
त्रस्त साऱ्या या दिशाही
ही त्वेषें घोषें धांवे यमुना तुडवुनि दोन्ही तीर !

(६)

शृंखलांनीं बद्ध असणें
तरिहि कारापार होणें
हें बाळा ! कैचें घडतें असतां नष्ट कंस बाहीर !

(७)

दुर्बलांचा देव वाली
पाठिराखा सर्व काळीं
ही आशानौका माझी राखो तोच संकटीं धीर !

—— ( विविधज्ञानविस्तार )

# बहिणीकरितां गाणीं

कविः—बालकवि.

[१]

बोल बाई बोल ग
　　तुझ्या बोलाचें काय वाणुं मोल ग ॥
डोल बाई डोल ग
　　जाइजुईचीं लाख फुलें तोल ग ॥
हांस बाई हांस ग
　　माझ्या आंगणिं माणिकांची रास ग॥
नीज बाई नीज ग
　　गाई अंगाई काऊ चीऊ तूज ग ॥

[२]

या बाई या ।
　　बकुळिच्या झाडाखालीं फुलें वेंचूं या !
उन पडलें ।
　　पान फुल दिसे कसें गोड गोडुलें !
गोड गोडुलें ।
　　मोतियाचे दाणे कोणीं खालीं पाडिलें ॥
रान हाललें ।
　　पहांटेला शुक्रदेव गाणें बोलिलें ॥

# केवढें हें क्रौर्य !

कविः—प० वा० **नारायण वामन टिळक.**

क्षणोक्षणिं पडे, उठे परि वळे, उडे बापडी;
चुके पथहि येउनी स्तिमित दृष्टिला झांपडी
किती घळघळां गळे रुधिर कोमलांगांतुनी,
तशीच निजकोटरा परत पातली पक्षिणी.
म्हणे निज शिशूंप्रती " अधिक बोलवेना मला
तुम्हांस अजि अंतिचा कवळ एक मी आणिला;
करा मधुर हा ! चला ! भरवितें तुम्हां एकदां
करो जतन यापुढें प्रभु पिता अनाथां सदा !
अहा मधुर गाउनी रमविलें सकाळीं जनां,
कृतघ्न मज मारितील नचही मनीं कल्पना !
तुम्हांस्तव मुखीं सुखें धरुनि घांस झाडावरी
क्षणैक बसलें न तों शिरत बाण माझ्या उरीं !
निघून नरजातिला रमविण्यांत गेलें वय,
म्हणूनि वधिलें मला ! किति दया ! कसा हा नय !
उदार बहु शूर हा नर खरोखरी जाहला
वधून मज पांखरा निरपराध कीं दुबला !
म्हणाल भुलली जगा विसरली प्रियां लेंकरां,
म्हणून अति संकटें उडत पातलें मी घरा;
नसे लवहि उष्णता, नच कुशींत माझ्या शिरा,
स्मरा मजबरोबरी परि दयाघना ईश्वरा.

असो रुधिर वाहुनी नच भिजो सुशय्या तरी
म्हणून तरुच्या तळीं निजालि ती द्विजा भूवरी;
जिवंत बहु बोलकें किति सुरम्य तें उत्पल
नरें धरुनि नाशिलें खचित थोर बुद्धीबल !
मातींत ते पसरले अतिरम्य पंख,
केलें वरी उदर पांडुर निष्कलंक
चंचू तशीच उघडी, पद लांबविले
निष्प्राण देह पडले, श्रमही निमाले !

( **टिळकांची कविता** )

---

# तानाजी मालुसरे

कवि-**कुंजविहारी.**

( धन्य धन्य भूपाल )

शिवरायाचा सिंह सिंहगडिं पडला समरांगणीं
मराठा गडी यशाचा धनी ॥ धृ० ॥
महाराष्ट्रभर पुण्याईच्या फुलल्या फुलवेली
सुगंधें सृष्टी दरवळली ॥
सह्याद्रीवर दरीदरींतुनि फिरुनी प्रेमानें
वेंचिलीं फुलें फुलाऱ्यानें ॥
फुलवरा वाहिला तेव्हां । बोलली भवानी आई ।
अपवित्र रक्त शत्रूचें । मम तहान शमली नाहीं ।
येउं दे नव्या नवसाचा । नैवेद्य अतां लवलाही ।

तानाजी करि शांत अंबिका स्वदेह पदिं अर्पुनी
    मराठा गडी यशाचा धनी ॥ १ ॥
जिजामाउली म्हणे, "शिवाजी, कोंडाण्यावरतें
    कुणाचें निशाण फडफडतें ! ॥
यश अस्मानीं दुष्मानाचें डुलतें डौलानें
    दरारा तुझा मनीं नेणें ॥
  सर करुनी गड कोंडाणा । देशील कधीं मज बाळा ।
  मी दिला मुलाचा मान । तानाजी मालुसऱ्याला ।
कोंडाण्याचें सुतकी वैभव बघवेना लोचनीं
    मराठा गडी यशाचा धनी" ॥ २ ॥
उभारिला अंगणीं सुमंगल मांडव लग्नाचा
    नोवरा सुत तानाजीचा ॥
महालक्ष्मी परी मंदिरीं मिरवत घरमाई
    कुठेंही उणेपणा नाहीं ॥
  पतिपत्नी अति आनंदें । जमवुनी सकल गणगोत ।
  देवकार्य पूजित होतीं । नोवऱ्या मुलासमवेत ।
  मंडपीं जाहली दाटी । बहु वाजंत्र्याचा थाट ।
शिवाजिचा जासूद पोंचला निरोप मग घेवुनी ॥
    मराठा गडी यशाचा धनी ॥ ३ ॥
"कामगिरी नेमिली आह्मांला गड कोंडाण्याची
    तयारी करा निघायाची" ॥

सेनासागर लग्नमंडपीं क्षणीं उचंबळला
घातला कर समशेरीला ॥
घरधनीण बोलत होती। एकांतीं तानाजीतें !
" या माझ्या रायाजीला। उजवुनी आपुल्या हातें।
एवढी विनंती माना। रणिं उद्यां जायचें होतें।"
स्वप्न उद्यांचें आज सतीला सांगितलें हो कुणी
मराठा गडी यशाचा धनी ॥ ४ ॥
" सखे साजणी शिवरायावर सोंपविली सारी
आमुच्या मनची मुखत्यारी ॥
हुकुम धन्याचा अवमानुनी मी इथें कसा राहूं
कसा मी बेइमान होऊं ? " ॥
शुभ शकुन शिवाची आज्ञा। साधुनी मनाचा मुहूर्त
रणिं निघे वीर झुंजार। स्वसुखावर हाणुन लाथ।
शिकविली शिस्त शिवबांनीं। अनुयायी आचरतात।
म्हणुनि मृत्युवर मात मिळविली लढुनी रणरंगणीं
मराठा वीर यशाचा धनी ॥ ५ ॥
उदयभानु सरदार आपणा यवन म्हणवि वाचे
परी तें बीज रजपुताचें ॥
सक्त शिस्तिनें करि रात्रंदिन राखण किल्ल्याची
दहशत मनीं मराठ्यांची ॥
गोंधळी बनुन तानाजी। स्वातंत्र्यपोत पाजळिला।
जन तेथिल भाविक मोठे। क्षणिं फितूर झाले त्याला
चुकवुनी पहारा जागा। चढविती गडावर हल्ला !

समरसंत ते मनांत हरहर महादेव गर्जुनी
मराठा गडी यशाचा धनी ॥ ६ ॥
समशेरींहुन असह्य संगरिं मार मराठ्याचा
उडविला फडशा शत्रूचा ॥
शत्रुसैन्य रणिं किती निमालें कोण करिल गणती
भयंकर काळोख्या रात्रीं ॥
ती नव्हे रात्र काळोखी । पांघरुनि कांबळा काळा ।
जणुं पार्थ–सारथी कृष्ण । साह्यार्थ धांवुनी आला ।
यश हानि धर्मवीरांनीं । वाहियली भगवंताला ।
मृत्युंजय जयवंत मराठी बाणा मर्दानी
मराठा गडी यशाचा धनी ॥ ७ ॥
शिणलेल्या सिंहावरि चालुनि उदयभानु ये रणा
जगाचा प्रहराचा पाहुणा ॥
शत्रु शिकारी वार बेजरब तानाजीवर करी
रणांगणिं पडला नरकेसरी ॥
रक्ताच्या संकल्पानें । नैवद्य दिला देहाचा ।
जगदंबा भक्ताहातीं । निःपात करवि शत्रूचा ।
फडकला गडावर झेंडा । स्वाभिमानस्वातंत्र्याचा ।
शिवाजिचें जयगीत गाइलें रणांत रणदेविंनीं
मराठा गडी यशाचा धनी ॥ ८ ॥
गड आला पण सिंह हरपला वदली शिववाणी
वाहती दुःखाश्रू लोचनीं ॥

त्या अश्रूंवर मालुसऱ्यांचा कीर्तिवेल वाढे

अजुनि जन गाती पोवाडे ॥

सद्भाव महाराष्ट्राचा । हें औषध अमरत्वाचें ।

मर्दांनी श्रद्धाबीज । खडकावर उगवायाचें ।

दिवसाला दिपवित होतें । या दिव्यतेज राष्ट्राचें ।

कुंजविहारी वंदि तयाला भावसुमनें वाहुनी

मराठा गडी यशाचा धनी ॥ ९ ॥

( गीत-गुंजारव. )

---

## झिम्मा

कविः-**रघुनाथ दत्तात्रेय सरंजामे.**

झिम्मा खेळूं ये झिम्मा नाचूं ये---

आकाशींचे तारेसंगें---झिम्मा खेळूं ये.

अंधारी ही रात्र काळी

कोणी पाहीना मुलींही

एकटीच अंतराळीं---झिम्मा खेळूं ये.

सप्तऋषींमध्यें सती

बैसलीसे अरुंधती

लाडक्या या आजीसंगें---झिम्मा खेळूं ये.

चांदण्याच्या चंद्रज्योती
हिमगिरी चकाकती
हांसऱ्या या ज्योतीसंगें—झिम्मा खेळूं ये.
चवथीची चंद्रकोर
हळू चाले सुकुमार
लाजऱ्या या पोरीसंगें—झिम्मा खेळूं ये.
काळ्या मेघामागें जाऊं
वीज नाचे पैज लावूं
नाचऱ्या या पोरीसंगें—झिम्मा खेळूं ये.
दक्षिणेचा झंझावात
रानफुलें उफाळत
झंझावातीं दोघें रंगूं—झिम्मा खेळूं ये.

( काव्य-कौमुदी )

---

# हे पहा आमच नव राज्य !

[ एक कुणबाऊ पद्धतीची लावणी ]

कविः—**नरसिंह चिंतामण केळकर.**

आम्हि राज्ये बनवल नव
जाक्षि तस जस मनाला व्होव
आमचे वर कुरपा क्यलि देव ॥ धृ० ॥

तार पोष्ट दोनिबी खाती
दिलि गोगलगइच्या हातीं
काय बिशाद् यत्याल तक्रारी
धा वरसांत येक 'डिलिवरी' ॥१॥

खेकड्या रेलगाडीचा
सुप्परदंड करु जलमाचा
मागफुड हवि तशी गाडी
वग्लन वग्लन काढी ॥ २ ॥

मांजरा केला रखवालदार
दुधलोणी राखायचा कारभार
कदि व्हइना इक्ति बिचारी
प्रामाणिक त्ये लइ भारी ॥ ३ ॥

गाढवा गुपित पोलीस
नेमून दिल आम्हि खास
त्यो उकीरडा फुंकून
घेइ चोरीचा तलास लावुन ॥४॥

कोल्होबा क्येला नैधीश
वादि परतिवादि बी खूष
न्हाइ मुद्दमालाचि बि तक्रार
समदा बिळात ग्येला पार ॥५॥

वाघसिंहाचि क्येली भरती
खिल्लार राखण्याखातीं
त्येला मायाच समद्याहून
राखतो पोटिं घालून ॥६॥

वानरा करू इंजन्येर
बांधकामाचं त्येला ध्येन थोर
रातभर करिल नकाशा
दिस फुटता गुंडाळि गाशा ॥७॥

दागदुजीचि समदी खातीं
दिलि उंदराघुशीच्या हातीं
शेताच्या वांदउरोळ्या
राखियात धरमशाळा ॥ ८ ॥

कुत्रा वकील परदरवारी
त्यो गुपित राखतो भारी
भुकु भुकुन अक्षि व्येजार
तह कराया लइ हुश्शार ॥ ९ ॥

हत्तिला क्येला वाकनीस
खंडीचा येकच घास
काटकसर्‍या हाय त्यो फार
खायाचच तुडवुन फार ॥ १० ॥

अस्वलाला खुषमस्करी
राजधन्याची करमणुक करी
हसवील गुदगुल्या करुन
गोष्टी सांगल कान भरभरून ॥ ११ ॥

येक वाणच पुरलि न अजुनी
नव्या राज्या हुडकतो धनी
आमि दमलों शोधशोधूनी
परि तयारच व्हइना कोणी ॥ १२ ॥

( काव्योपहार. )

---

# नारंगीचें लग्न

कविः-अमृत्या गोंधळी नाशिककर

जांव जांवळी विचार करिती नारंगीचें करुं लग्न ॥
अंजिर नवरा रूप पाहिला वनस्पतीला या घेउन ॥ धृ० ॥

बोरू हातीं लिहूं पत्रिका धाडुन देऊं वनस्पतिला ॥
जाईजुइनें मांडव घालुनि हळद लावती नवऱ्याला ॥
बोरी खिराणि चालालि तांतडि कौठ बैसली न्हायाला ॥
केळें फडफडित नागन कडकडित सुपारि जाती लग्नाला ॥

आवळी झाली बावरी लिंबुनी चालत असे जलदीनें ॥
एकल टांकळ दोघी भांडती सौंदळ समजति प्रीतीनें ॥
सिद्ध चाल जलदीनें चिंच वटीक आली धांवून ॥
आईक पिपरे बैस झिपरे देवदेव घेऊं उर्कून ॥
मोठमोठाले वृक्ष वऱ्हाडी मूळ पाठविले त्यासी ॥
कोंकणचे रैवासि जायफळा घेउन आले लवंगासी ॥
अरे चंदना रक्तचंदना पतंग जातो लगनासी ॥
मदन बिहाडा बोले शिंगाडा घेउन ये तूं डवनासी ॥
परित त्याचे लाल दांडे काय पोऱ्या हा गुलबासी ॥
गुलतुरा म्हणे गुलझब्बूला कणेर बेटा भिकारी ॥
गुलतुऱ्यानें तुरा लाविली झेंडु चालले बरोबरी ॥
द्राक्षनी मांडव घालुनी सारफळ वर बसवुनी ॥
अंजिर नवरा रूप पाहिला वनस्पतिला या घेउनी ॥

( **नवयुग** )

---

# यमुनातीरीं—

कवि:-श्रीयुत **वि. शं. कात्रे**

( **चाल:**-शिंप्याघरीं वै शिवायला. )

उगवुनि आला,
पुनिवेचा, चांदोबा ॥
सुस्वर गर्जे,
यमुनेचा, धबधबा १

धवलित झालीं,
वाळूचीं, मैदानें ॥
सारविलीं जणुं,
शाडूच्या रंगानें २

ता. नं.
ता.

## यमुनातीरीं

शीतळ वारा,
वाहे हा झुळझुळू ॥
डुलतीं रानें,
आनंदें हळुहळू २

फुलल्या वेली,
दिसती त्या, रंगीत ॥
त्यांवरि गाती,
भुंगे हे संगीत ४

निजले पक्षी,
वृक्षांच्या ढोलींत ॥
शांतचि सारें,
शांतीच्या राज्यांत ५

तटस्थ झाडें,
हालेना, मुळिं पान ॥
शांत विराजे,
निर्जन हें मैदान ६

मुरलीनादें,
दुमदुमतें परि रान ॥
जिकडे तिकडे,
भरलें कीं तें गान ! ७

वृंदावनिंच्या,
गोकुळिंच्या, गौळणी ॥
[illegible] भुलल्या मंजुळ,
गायन तें ऐकोनी ८

कोणी मुरली
वाजवितो समजेना ॥
कोठें वाजे,
स्थानहि तें समजेना ९

जिकडुनि तिकडुनि
कानीं ये, तें गान ॥
तेंव्हां कैचें
गोपींना, त्या भान ! १०

धांवत सुटल्या,
सोडूनी, घरदार ॥
कोठें मुरली,
वाजवितो, सरदार ! ११

हिंडुनि धुंडुनि,
दमल्या त्या गौळणी ।
गवसेना परि,
मुरलीचा, त्यां धनी १२

कोठें म्हणती,
आहे तो सांवळा ॥
सोसूं किति हा,
प्रेमाचा कळवळा ! १३

ऐसा पाहुनि,
गोपींचा, तो रंग ॥
प्रेमें भेटे,
धांवोनी श्रीरंग १४
तेव्हां गोपी,
नाचती, आनंदें ॥
मुरली वाजवी,
कान्हा तो, त्या छंदें १५
प्रेमें भुलला,
विश्वाचा, तो नाथ ॥
गोपींसंगें,
नाचतो रंगांत ! १६

(आनंद)

---

# गाई घरा आल्या

कविः—**वनमाळी.**

गाई घरा आल्या—घणघण घंटानाद
कुणिकडे घालूं साद—गोविंदा रे
गाई घरा आल्या—धूळ झाली चहुंकडे
घन:श्याम कोणीकडे—माझा गेला
गाई घरा आल्या—वांसरें हंबरती
कुणीकडे बालमूर्ती—कृष्ण माझा
गाई घरा आल्या—ब्रह्मानंद वांसरांना
काय करूं माझा तान्हा—चुकलाना ?
गाई घरा आल्या—घोटाळती पाडसाशीं
हाय नाहीं हृषिकेशी—माझ्यापाशीं.
गाई घरा आल्या—आवरेना मुळीं पान्हा
राहणार भुका तान्हा—वासुदेव.

गाई घरा आल्या—झाली बाई कातर वेळ
अजूनी कां घननीळ—येना घरा.
गाई घरा आल्या—लावियेली सांजवात
बाळा दामोदरा रात—झाली न कां ?
गाई घरा आल्या—पाल चुकचुक करी
राख अंबे माझा हरी—असे तेथें.

(महाराष्ट्र-शारदा)

# कळ्यांचीं फुलें कशीं झालीं ?

कविः—**गोविंदाग्रज.**

बाळ कुणी । सध्याकाळीं रमे गुणी ॥
खेळतसे । बाळ आंगणीं हवें तसें ॥
बागेंत । मौजेनें झोंके घेत ॥
तों दिसली । सुंदरशी त्याला वेली ॥
देंठ कोंवळे । हिरवे पिंवळे । नाजुक सगळे ॥
ती वेली । हिरवा शालू पांघरली ॥ १ ॥
परी तया । हवा सोबती खेळाया ॥
खेळगडी । मूल फूल सुंदर जोडी ॥
पाहतसे । परि वेलीला मूल नसे ॥
तिच्या कळ्या । होत्या मिटलेल्या सगळ्या ॥
जणुं दमल्या । फार खेळुनी; मग निजल्या ॥
हवेंत डुलणें । हेंच खेळणें । खेळुनि निजणें ॥
ही त्यांची । गादी हिरव्या पानांची ॥ २ ॥

बाळ गुणी । वाईट वाटे फार मनीं ॥
दिवसभरी । खेळुनि आला परत घरीं ॥
झोंपेंत । कितिदां गेला बागेंत ॥
धरि कुठें । पहांट होतां बाळ उठे ॥
बागेंत । धांव तसाची तो घेत ॥
मौज तों किती । कळ्या न दिसती । फुलेंच हंसती ॥
बाळ डुले । चहूंकडे पाहून फुलें ॥३॥
आईला । शोधाया धांवत गेला ॥
मग बोले । आई बघ हीं गोड फुलें ।
काल कळ्या । आज फुलें झाल्या सगळ्या ॥
कशा उमलल्या । कुणीं हंसविल्या । हांसत बसल्या ॥
कशा कळ्या । आई सांग मला सगळ्या ॥ ४ ॥
मग आई । बाळाला उत्तर देई ॥
" खेळासी । जमति चांदण्या आकाशीं ॥
त्या हंसती ! चहूंकडे पाहत बसती ॥
तों दिसल्या । कळ्या बिचाऱ्या हिरमुसल्या ॥
कळवळल्या । फार चांदण्या मग रडल्या ॥
आंसू पडले । ते दंव झाले । धांवत आले ॥
भुईवरी । पडले साऱ्या कळ्यांवरी ॥५॥
तो साचा । रंग पांढरा तारांचा ॥
कळ्यांवरी । चहूंकडे जाउनि पसरी ॥
मग हंसल्या । कळ्या फुलें हंसतां झाल्या ! ॥ "
सर्व असें । आई बाळा सांगतसे ॥

ऐकुनि हें । बाळ तिच्या वदना पाहे ॥
कां न कळे । मिठी मारिली तिला बळें ॥
त्या काळीं । आई आनंदें हंसली ॥
हंसतां रडली ! असवें पडलीं । त्याच्या गालीं ॥
तों साची । कळी उमलली बाळाची ! ॥ ६ ॥

---

# समता

( कविः—**आनंद** )

आधीं भाकर दर एकाला, नंतर श्रीमंता पोळी ॥ धृ० ॥
ऐका लक्षाधिश ऐका । राहूं दे तुमचा पैका
उघडा राजर्षी कान । राहूं दे तत्त्वज्ञान
जड वैदिक ऐका मंत्र । स्वार्थाचें जळुं दे यंत्र
जगद्गुरो ऐका धर्म । धिक् तुमचें सत्ता—वर्म
धर्मलंड, धार्मिक किंवा । वेदपुराणें वा फतवा
समान मम छत्राखालीं । ब्रह्म, क्रिस्त, महमदअल्ली
असो कुणीही कसा असो । कुणास त्याची भीति नसो
समतेचा जो अभिमानी । तो अवघा देवावाणी
मूर्ती फोडिन । जनता जोडिन ॥
रूढी तोडिन । करीन विषमाची होळी ॥
आधीं भाकर दर एकाला, नंतर श्रीमंता पोळी ! ॥ १ ॥
शरिरानें श्रम करणारा । द्रव्याचा त्या हक्क खरा
निढळानें श्रमतां हात । सर्व वंद्य तो जगतांत
आज परी त्याचा घात । ‘ डोक्यानें ’ केली मात

पवित्र मजुरांचे कष्ट । बुद्धि परी बनली भ्रष्ट
शरीरश्रम हें शुभकर्म । मनुजाचा पहिला धर्म
हातानें श्रम करणारे । तेच जगाचें धन सारें
बुद्धीचें बिरुदवाले । पुरे करा जुलमी चाळे
विषवृक्षाचे मळे सुको । जगांत माझ्या तुम्ही नको
मूर्ती फोडिन०
आधीं भाकर दर एकाला, नंतर श्रीमंता पोळी ॥ २ ॥
( प्रबोधन

---

# स्वर्गी या उत्तम जागवी भारता

कविः—ऋग्वेदी

भयशून्य जेथें चित्त मानवाचें ।
मस्तक तयाचें उच्च जेथ ॥
जेथ ज्ञान नांदे मुक्त आणि साध्य ।
होवोनी आराध्य सकलिकां ॥
संसाराचे जेथ खंड न पडले ।
ऐक्य न बुडालें कलहानें ॥
हृदयांतुनियां उत्साहें फुटती ।
शब्द सत्य प्रीतियुक्त जेथ ॥
स्रवति अजस्र लक्षविध जेथ ।
शुद्ध अविरत कर्मधारा ॥

देशोदेशीं सर्व दिशांमाजी कर्में ।
पूर्णत्वार्थ नेमें धांव घेती ॥
जेथ न बुझाला ओघ विचारांचा ॥
तुच्छ आचाराच्या वाळवंटीं ॥
जेथ पौरुषातें वाव मिळे सदा ।
कर्तृत्व शतधा प्रगटेतें ॥
सकल कर्माची चिंता तूं वहासी ।
योग्य मार्गें नेसी जनां जेथ ।
करीं निज हस्तें निर्दय आघात ।
चेतवीं भारत तेथ स्वर्गीं ॥
स्वर्गी या उत्तम जागवीं भारता ।
प्रभो विश्वनाथा मायबापा ॥

(अभंगगीतांजली)

---

# शिवकालीन मेटकऱ्यांचें गाणें.

कविः—किरात.

आह्मीं रांगड गडकरी—मेटकरी ।
मारूं गोफण, मारूं गोफण ।
भिरीरिरी रिरीरिरी ॥ आह्मी रांगड० ॥
आमच्या गोफनींची फेंक ।
जनुं सगशेरींची टेक ।

पाडी म्होरक्यांचें दांताड ।
फोडी दुस्मानाचें छाताड ।
आमचं गोफनींचं गुंडं ॥
जनु तोफंचीं तोंडे ॥ जाती सुंसूं सुंसूं सुंसुंसूं ।
आम्ही रांगड० ॥१॥
आमच्या गोफनीचं गोळं ।
जनु फेंकीच भालं ।
शेंदऱ्या वागाच डोळ ।
जनुं पट्ट्याच गुंडाळ ।
आमुचं गोफनीचं गुंडं, इत्यादि० ॥२॥
आमच्या आजापंजांचीं हाडं ।
गडावरलं वारं उठवी धडाडं ।
फोडी पार शत्रूचीं छाताडं ।
भेदी दुस्मानाचं नरडं ।
आमचं गोफनीचें गुंडं, इ० ॥३॥
गडावरल्या भुरट्या जाळी ।
आमच्या बनती समशेर ढाली ।
आमच्या येली आमचीं झाडं ।
धरती दुस्मानाचं नरडं
आमचं गोफणीचं गुंडं, इ० ॥ ५ ॥
आह्मा मर्दांचा किल्ला ।
हटविल शत्रूचा हल्ला ।
मोडून समदा त्येचा गिल्ला ।

लावील त्येला रडायाला ।
आमचं गोफनीचं गुंडं ।
जनुं तोफेचीं तोंडं । जाती सुंसूं० ॥
आम्ही रांगड गडकरी—मेटकरी ।
मारूं गोफण, मारूं गोफण । भिरीरिरी० ॥

( पन्हाळगडचा किल्लेदार )

---

## जिवबादादा बक्षी

कविः—**माधव.**

समशेरीला समशेर—गनिमाची अझुनि न भिडली,
गर्जना न एकहि अजुनी—गगनाला फाडित उठली,
राजांची मैदानाच्या—पहिलीच सलामी झडली !
जनतेचें काळिज मूर्त
जरिपटकाध्वज विख्यात !
घेउनी रणांतुनि पळत
नापाक तोंच हा कोण ? २

यदुवंशविलासनृपांनीं—आसेतु करुनि थैमान
लाविलें द्रविड राजांना—ज्यापुढें कराया नमन,
जो मिरवित भाऊरायें-हालविलें हिंदुस्थान,
हालत्या घड्यांवर ज्याच्या
मसनदी हलति यवनांच्या,
त्या ध्वजास निजराष्ट्राच्या
काळिमा कोण हा लावी ? २

पळपुट्या राउताला या—गांठुनी ओढुनी खालीं
दावील जरीपटक्याला—रण पुन्हां असा बलशाली
सुत एक महाराष्ट्रींची—माय काय नाहीं व्याली ?
दुर्दैव किती हें थोर !
जाउनी खरे झुंजार
राहिले कराया समर
हे केवळ भोजनवीर !
निर्जीव, परी राष्ट्राचा—जीव, तें निशाण निघालें !
एकही तरी धमनींत—नाहींच रक्त सळसळलें !
थंडेच जागच्याजागीं—सर्वही मराठे झाले !!
विस्मरण न हें स्वत्वाचें
हें मरण राष्ट्रधर्माचें !
हे भावि गुलामगिरीचे !
डोहाळे समजा पहिले !
पण नको अशुभ ही वाणी—आल्याच दुरुनि या हांका !
ये दौडत दौडत वेगें—भालाइत कोणी बांका !
कोण हा महाराष्ट्राच्या—इभ्रतिचा पाठीराखा ?
रोधिलें पुढुनि मार्गाला
अडविला पलायनवाला !
हिसकिलें जरीपटक्याला
थुंकुनि मुखावर बोले:—
"नेशील कुठें नादाना !—चेतना महाराष्ट्राची ?
जोंवरि जागती ज्योत—जीवाची या जिवब्राची,
जा खुशाल आतां पळुनी—परवा न कुणाला त्याची

येसी न तमाशा नाचा, ॥
जो सुखासीन बघण्याचा ॥
हा होमचि सर्वस्वाचा ॥
राष्ट्रास्तव रणफंद्यांचा ! ६

पळशील कितीरे पळुनी ? अति नाजुक तूं उमराव !
शिंद्यांच्या तोफांमागें—जा लपुनि बैस ! वांचीव—
निजराष्ट्राहुनिही प्यारा—आपुला अमोलिक जीव !
तान्हेल्या शस्त्रां आजी
रिपुरुधिरें पाजुनि ताजीं
एकलाच राखिल बाजी
हा जिवबा शिवशाहीची !

इतुकेंच बोलुनी बोल—मारिली टांच अश्वाला
एकदांहि वळुनी मागें—पाहिलें न त्या भ्याडाला !
रणकेसरि हरिपंताला—रणभीरु कारटा झाला,
म्हणुनियां व्यथित जरि चित्त,
फौजेंत परतला त्वरित;
फडकत्या ध्वजासह शिरत
चैतन्य नवें दळभारीं. ९

फडफडे जवें जरिपटका—तडफडे शत्रु लवलाही
तोफांच्या मारगिरीनें—यवनांची फुटली लाही !
तुटुनियां शिरें किती पडलीं—गणतीच तयांना नाहीं !
चेतलें युद्ध घनघोर
लागला निजामा घोर !
स्वाधिन करुनी मश्रूर
श्रीमंतां आला शरण ! १०

ग्रंथ संग्रहालय
ता. काव्य नं. ५७
ता.

धन्य ! धन्य जिवबा मर्द ! मर्दुमकी त्याची न्यारी !
धन्य ते तयाचे वीर ! धन्य तीहि कर्तबगारी !
हा जरिपटका ध्वज धन्य !—धन्य ही यशस्वी स्वारी !
या महाकालिका धन्य !
हे विजयी भाले धन्य !
समरघोष ' हर ! हर ! ' धन्य !
धन्य ! ही धन्य शिवशाही ! ११

सजवुनि दलबादल डेरे—दरबार भव्य भरवोनी
सत्कारुनि जिवबालागीं—गौरविलें श्रीमंतांनीं !
केला मग जयजयकार—दरबारीं उमरावांनीं !
" शौर्याचा पारावार
शिवशाहीचा आधार "
गर्जले मराठे वीर,
" हा जिवबादादा गाजी ! "

जरि अन्याच्या उत्कर्षी—असहिष्णु आजवर झाले,
चमकले तेहि परि आज—नानाचे हिरवे डोळे !
मारुनी मिठी जिवबाला— फडनवीस नाना बोले:—
" आणोनी परत निशाण
रक्षिला न केवळ मान,
परि वांचवलारे प्राण,
जिवबा ! त्वां शिवशाहीचा " १२

( नवयुग )

# एकच आशा

कविः—**नागेश.**

अतां एक आस उरे कीं, विभो ! तुला ध्यावें ॥ ध्रु० ॥

कैक फुलांसंगें केले नित्य नवे खेळ,
तारकामणींची रचिली सुबक गोड माळ,
कोमलकरिं विणिलें प्रेमें इंदुकिरणजाल,
गमे अतां या हृदया तें सर्व तुला द्यावें;
अतां एक आस उरे कीं विभो ! तुला ध्यावें. १

अंबरगत हीरक, कुसुमें, इंदुकिरण तैसे,
चिरगायन गुणरत सरिता, विहगवृंद खासे
हीं तुझींच मोहक रूपें, स्पष्ट मना भासे,
म्हणुनि त्यांस रचिलें गाणें तें तुवांच ध्यावें;
अतां एक आस उरे कीं प्रभो ! तुला ध्यावें. २

किती गोड कुसुमें, वेली किती गोड गोड,
किती गोड रानें पुलिनें किती गोड गोड,
किती गोड वारा, जग हें किती गोड गोड,
ही तव कृति ! मग तूं रूपें किती गोड असावें ?
अतां एक आस उरे ही प्रभो ! तुला ध्यावें. ३

गमे अतां जड सृष्टीची पायरी त्यजावी,
ती परोक्ष मूर्ती नयनीं एकदां पहावी,
ही प्रपंचजन्य दुराशा तत्क्षणीं चुरावी,
हृदयसदन अजितप्रेमें सतत भूषवावें;
अतां एक आस उरे कीं, प्रभो ! तुला ध्यावें. ४

# अंगाई गीत.

कविः—**भास्कर रामचंद्र तांबे.**

( **चालः**—चारा सोडुनियां )

जो जो जो जो रे !

घरटीं तीं
फांद्यामधुनी झुलती
निजले चिउ काऊ !
निजवीती
झुलुका गाउनि गीती
गाणीं किति गाऊं ? ॥ जो० ॥

हम्मा ही
दूदू देउनि पाहीं
निजल्या गोठ्यांत !
रे छबिल्या
राघू मैना निजल्या
अपुल्या ! पिंजऱ्यांत ॥ जो० ॥

यावेळीं
निजलीं झाडें वेली !
निजला चांदोबा !
रात्र किती
चढलीं काळी भंवतीं
आला बागुल बा ! ॥ जो० ॥

शुक्र गडे
झालें जिकडे तिकडे !
झोंप न तुज बाळा !
खिंदळशी
खुदु खुदु खुदु हंससी
एकच हा चाळा ! ॥ जो० ॥

# गड्या कोकिळा

( चालः—आनंदी आनंद गडे. )

रूप तुझें गोजिरवाणें
मधुर किती सुस्वर गाणें !
नयन किती हे सुविलोल !
स्वस्थ जणूं तेजोगोल !
बागा फुलती
फुलें हांसती
कविही भुलती
ताना येतां पिकद्विजा !
गाइं ! गाइं ! माझ्या राजा ! ॥ १ ॥
स्वैर तुझ्या संगीताला—
ऐकुनियां चैतन्याला—
पालव फुटती तरतरुन !
दिव्य तुझें ऐसें गान !
चित्त फुलवितें ॥
उमेद देतें ॥
प्रेम सिंचितें ॥
आनंदाचा तूं कंद !
तुझा मला जडला छंद ! ॥ २ ॥
कवि कुलमान्या ! विहंगमा !
चित्त भ्रमलें ! प्रियोत्तमा !

हौस वरें माझी कोण—
फेडणार तुजविण अन्य ?,
गड्या कोकिळा ।
गळा मोकळा ।
कर वेल्हाळा !
लाग गीत ऐसें गाऊं
तान भूक माझी जाऊ ! ॥ ३ ॥

( खेळगडी. )

---

# 'शिवराज आणि बालवीर.'

कविः–**वा. भा. पाठक.**

( 'मी परत येईपर्यंत या शिवेवरून तूं कोण्याही स्वारास जाऊं देऊं नकोस' ही शिवबापासून मोठ्या कष्टानें मिळविलेली कामगिरी सावळया बजावीत आहे. )

( **चालः**—भला जन्म हा )

सावळ्याः—

खबरदार ! जर टांच मारुनी जाल पुढें चिंधड्या
उडविन राइराइएवढ्या ॥ धृ० ॥
कुण्या गांवचे पाटिल आपण कुठें चाललां असे
शीव ही ओलांडुन तीरसे ?
लगाम खेंचा या घोडीचा राव टांग टाकुनी
असे या तुम्ही खड्या अंगणीं

पोर म्हणूनी हंसण्यावारी वेळ नका नेऊं ही
मला का ओळखलें हो तुम्ही ?
हा मर्द मराठ्याचा मी बच्चा असें,
हें हाडहि माझें लेचेंपेचें नसे
या नसानसांतुन हिंमतबाजी वसे
खबरदार जर टांच मारुनी जाल पुढें चिंधड्या
उडविन राइराइएवढ्या ॥ १ ॥

स्वार:—

मळ्यांत जाउन मोटेचें तें पाणि धरावें तुवां
कशाला ताठा तुज हा हवा ?
मुठींत ज्याच्या मूठ असे ही खड्गाची तो बरें
वीर तूं समजलास काय रे ?
थोर मारिशी अशा बढाया पराक्रमाच्या जरी
कुठें तुज बिरचा भाला तरी ?
हें खड्गाचें बघ पातें चमके किती,
अणकुचीदार हें भाल्याचें टोंकही,
यापुढें तुझी ती हिंमतबाजी किती—
तुला वाटतें 'मराठियाच्या' काय खुळ्या पोरग्या ?
दूर हो नको मरूं तूं उगा

सांवळ्या:—

मोठे आपण दाढीवाले अहां वीर बायकी
किती ते आम्हाला ठाउकी,

तडफ आमुच्या शिवबाजीची तुम्हा माहिती न का ?
दावितां फुशारकी कां फुका ?
तुम्हासारखे असतिल छप्पन लोळविले भर रणीं
आमुच्या शूर शीवबाजिनीं
मी त्यांचा पक्का इमानि चेला असें
हुकुमाविण त्यांच्या समजा याचे पुढें
देईन न जाऊं शूर वीर फांकडे
पुनः सांगतों खबरदार जर जाल पुढें चिंधड्या
उडविन राइराइएवढ्या

*    *    *

लालभडक तें वदन जाहलें बाळाचें मग तसें
स्वार परि मनीं हळू का हंसे !
त्या बाळाच्या नयनीं चमके पाणी त्वेषामुळें
स्वार परि सौम्य दृष्टिनें खुले.
एक दिसे चंद्र जणूं दुसरा तपतो रवि का तरु ?
ऐका शिवबाचे हे स्वर—
"आहेस इमानी माझा चेला खरा
चल इनाम घे हा माझा शेला तुला
पण बोल सावळ्या पुनः बोल एकदां
खबरदार जर टांच मारुनी जाल पुढें चिंधड्या
उडविन राइराइएवढ्या

( चित्रमयजगत् )

# विचारा शेतकरी !

कविः—**अज्ञातवासी.**

रवि तळपे डोईवर
शेतांत खपे नांगर ॥ धृ० ॥

कृश बैलांची जुंपुनि जोडी
आल्या दिवसा ओढुन काढी
कष्ट सारखे ऐसे ओढी
विसावा न घडिभर ! १

कष्ट वर्षभर करील जेव्हां,
अर्ध्या पोटीं राहिल जेव्हां,
ऐदी श्रीमान् जगतिल तेव्हां,
खपे मरे तोंवर ! २

आकाशाचा वरी आसरा
खालीं प्रेमळ जगविते धरा
शांती वाया—वाहे वारा
अढळ भाव प्रभुवर ! ३

शेत तयाचें जेव्हां पिकतें
मन आनंदुन तेव्हां जातें
वैभव हें पण पळभर टिकतें
पुढें दिवस खडतर ! ४

चित्र असें हें जेव्हां दिसतें
होरपळुन मन वेडें होतें
गाणें दुःखावेगें फुटतें
आणि तुटे अंतर ! ५

(**अज्ञातनाद**)

# गोकलखां—

कविः--**माधव.**

हा कोण इथें पडलेला ?

" गोकलखां लढनेवाला ! "

*　　　*　　　*

स्वातंत्र्यसूर्य अस्ताला--पावतां महाराष्ट्राचा,
अर्घ्य त्यास अर्पुनि ज्यानें--आपुल्या उष्ण रुधिराचा,
चढविला रक्तिमा रम्य--तद्बिंबावरती साचा !
शत्रूवरि पडला तुटुन,--शौर्याची शर्थ करून,--
समरांत वेंचिले प्राण,
विदित तो नसे कोणाला--गोकलखां लढनेवाला ? १
तिमिर तेज एके समयीं--वसतिल का त्याच ठिकाणीं ?
असिलता नांदणें दोन--शक्य केंवि एके म्यानीं ?
प्रभु दोन महत्वाकांक्षी-- राहणें न हिंदुस्तानीं !
कलह थोर म्हणुनी माजे--युद्धाचा डंका वाजे !
वीरनाम संतत गाजे !
वीर हा परी शेवटला !--गोकलखां लढनेवाला ! २
अष्टयाच्या मैदानांत--लागला अखेर निकाल !
बंदुकीवरी बोथटले----जरि कराल तरि करवाल !
पाश्चात्य संस्कृतीपुढतीं----पौर्वात्य पद्धती फोल !
खड्गांचा गेला काळ--खत्वाला विसरे ढाल----
भालेही कवडी मोल !

घायाळ होउनी पडला—गोकलखां लढनेवाला ! ३

प्रेतांच्या जागोजाग—राशींवर पडल्या राशी !
रक्ताचें घडलें स्नान—अष्टयाच्या रणभूमीसी !
लोळल्या ध्वजा धूळींत—मुकुनियां पूर्व—विभवासी !
कोरडा कंठ होवोनी—घायाळ शिपाई कोणी—
करिताती ' पाणी ! पाणी ! '
चावी परि अधरोष्ठाला !—गोकलखां लढनेवाला ! ४

वीरोचित शय्येवरतीं—पहुडला पुन्हां न उठाया !
अरिला न ज्यामुळें निद्रा—तो सजला निद्रा घ्याया !
पातला जरी कल्पांत—तरि अंत न निद्रेला या !
रक्ताचा वाहुनि पूरये— दुर्बलता अनिवार !—
ग्लानीहि वारंवार !
दृढ तरी धरी खड्गाला !—गोकलखां लढनेवाला ! ५

शेवटला आशातंतू—शेवटल्या श्रीमंतांचा,
अवशेष उग्रतेजाचा—निःशेष आज व्हायाचा !
हा अस्तंगत रवि—किरण—क्षणमात्रें लोपायाचा !
कांपरें सुटे अंगाला—शत्रूंच्या, बघतां ज्वाला;—
गृध्रांचा त्यांवरि डोळा !
चित्तीं न परी गडबडला—गोकलखां लढनेवाला ! ६

इहलोकांतिल उत्कर्ष—हा दिव्य राजनिष्ठेचा !
हा अखेरचा कल्लोल—दाक्षिणात्य शौर्याब्धीचा !
हा शेवटला उच्छ्वास—श्रीस्वतंत्रतादेवीचा !

आंचके अखेरिस आले,—एकदां शरीरहि हाले,—
पांढरे जहाले डोळे !
निष्प्राण होउनी पडला—गोकलखां लढनेवाला ! ७
मर्दुमकी मेली सारी—वरपगडा अधमत्वाचा !
ही स्वराज्यनिष्ठा मेली,—सुळसुळाट घरभेद्यांचा !
विहगेश्वर विगतप्राण—कोलाहल काकोलांचा !
दुष्कृत्यफलां भोगाया,—मंदभाग्य बाजीराया !—
हो तयार जन्मांतचि या !
आधार तुझा हा तुटला !—गोकलखां लढनेवाला ! ८
खणखणाट तरवारींचा—आतां न पुन्हां व्हायाचा !
यापुढें न भगवा झेंडा—कोठेंही नाचायाचा ! !
समरघोष 'हरहर !' ऐसा—श्रवणीं न कधीं यायाचा !
शांतीचें वसलें ठाणें !—आतां न कधीं मैदानें—
रंगतील नररुधिरानें !
समशेरबहाद्दर गेला—गोकलखां लढनेवाला ! ९
संपला इथें इतिहास—शिवरायाच्या राज्याचा !
आतां न राहिला काळ—मर्दानी पोवाड्यांचा !
आटला झरा येथून—चैतन्ययुक्त वाणीचा !
अष्ट्याचें तरि मैदान—स्फूर्तिप्रद गातें गान !
आठवतो तेथिल अझुन
वृक्ष—लता—पाषाणांला—गोकलखां लढनेवाला ! १०

(नवयुग)

# दुर्भागी हा देश होवो मंगलमय

कविः—'ऋग्वेदी'

( टागोरच्या गीताचा अनुवाद. )

दुर्भागी हा देश होवो मंगलमय । सर्व तुच्छ भय दूर करीं ॥
लोकभय राजभय मृत्युभय । करीं तूं विलय भयांचा या ॥
दुर्बल दरिद्री झालों दीन प्राण । भूभार पाषाण जेवीं जगीं ॥
रात्रंदिन यंत्रीं पिळोनी निघतों । धूळींत कंठितों दिन दैन्यें ॥
क्षणोक्षणीं होते जीवनीं दंडणा । मानाची खंडणा परोपरी ॥
अंतरीं बाहेरी रज्जू ते दास्याचे । दास सहस्रांचे झालों आम्ही ॥
त्रस्त सदा मनीं शिर अवनत । मानव–जीवित–गर्व गेला ॥
लज्जाराशीखालीं गेलों चिरडोनी । सार्थक जन्मोनी नसे कांहीं ॥
चूर्ण करीं देवा चरण–आघातें । नाना आपदांतें क्लेशदायी ।
मंगल प्रभातीं उच्च शीर्षे जन । सेवोत सन्मान मानवाचा ।
अंधार दवडीं लोपवीं अज्ञान । बुद्धि तेज धन देई देशा ॥

( **अभंग गीतांजली.** )

---

# सांगा माझें नांव

कविः–प्रो. **वासुदेव बळवंत पटवर्धन.**

सांगा माझें नांव गड्यांनों सांगा माझें नांव ॥
जेथें जाई जेथें राहीं तेथें माझा गांव ! ॥ १ ॥
ताई रुसली माई फुगली कुशी उडाली वाव ॥
तुट्टीची मी गट्टी करितों, नुरवीं वैरा वाव ॥ २॥

सदू उसळला, नारू तटला, रामू म्हणतो 'जाव' ॥
या सगळ्यांना पुनः मिळवितों खेळायातें डाव ॥ ३ ॥
वारा भांडे झाडासंगें सुटला त्याचा ठाव ॥
राग तयाचा निववीं, जुळवीं पुन्हा गोडिचा भाव ॥ ४ ॥
फुलां हंसवितों, मुलां खुलवितों रंका भिडवीं राव ॥
भेद विसरवीं, रंग नाचवीं, सर्वां एकच भाव ॥ ५ ॥
राग हारवीं, लोभ सोडवीं, जिरवीं खोटी हांव ॥
हेवा दावा उडवीं द्वेषा राहों नेदी नांव ॥ ६ ॥
चोर चहाडां जागा नाहीं सारे येथें साव ॥
सुख संतोषीं नव्हे मजपुढें चिंतेचा शिरकाव ॥ ७ ॥
भावाभावांपरी नांदती शूर गाजती राव ॥
कुडें वांकडें रडे, भल्यांचा येथें होय वनाव ॥ ८ ॥
हें शांतीचें, हें मौजेचें, हें गोडीचें गांव ॥
रमती, गमती, हंसती, डुलती येथें भोळे भाव ॥ ९ ॥

( खेळगडी. )

---

# मुरली

कवि:—**कै. गोविंद.**

( वृंदावनींची मोहिनी आणि भारती रणींची ज्ञानरूपिणि अशा दोन्ही रूपानें नटणाऱ्या हरिप्रियेची आज भारतवर्षाला जरूर आहे. )

भारता तार या कालिं कालिं । हरि वाजिव गीता मुरली ॥धृ०॥
नाचून कालिया मौलि मौलि । हरि वाजिव गीता मुरली ॥

परतेचा हल्ला आला
फितुरीचा मारा झाला
ऐक्याचा किल्ला पडला
धनराशी चोरी गेला
परतंत्र मायभू झालि झालि। हरि वाजिव गीता मुरली ॥ १ ॥
कलहाचें नाचे भूत
समतेचा झाला अंत
पडलेंच ज्ञान बंदींत
हें सत्य करी आकांत
न्यायश्री अश्रू ढाळि ढाळि। हरि वाजिव गीता मुरली ॥ २ ॥
लोकांस कळेना वर्म
मानिती अधर्मा धर्म
तत्त्वांचें सरलें प्रेम
प्रेमाचें नुरलें नाम
नरकानें जनता न्हालि न्हालि। हरि वाजिव गीता मुरली ॥ ३ ॥
हरि वाजिव गीता मुरली
कर सुजना विक्रमशाली
धैर्याची झडुं दे भेरी
नाचुं दे धर्मबल समरीं
होउं दे सत्य जयशालि शालि। हरि वाजिव गीता मुरली ॥ ४ ॥

( गोविंद-गीत )

# हक्काची फांक*

कवि—**भालचंद्र.**

( **चाल**—पोवाड्याची. )

थाटला हाट मोकाट गडावर भारी !
ये टीप उकळण्या देशमुखांची स्वारी !
डोईस पागडी कंदी
आंगीं ती बाराबंदी
पायींची वहाण खंदी
ये ठोकित काठी देशमुखांची स्वारी
थाटतां हाट मोकाट गडावरि भारी १
' चल टाक टीप ' काढुनी सूर सरदारी
आरडे हरेका स्वारी भर दरबारीं
" बागवानिणी ! कां देरी ?
चल टाक टीप ! कां बाहिरी ?
टकमका पाहि म्हातारी !,
" हा पहा भोपळा एकच भाजी दुसरी,
नाग्री रे दादा करूं आतां काय तरी ? " २
" आं काय ? भोंपळा एकच ? तर काढ सुरी
नी टाक आमची हक्काची फांक तरी ? "

---

* **टीप**—सरदेशमुखीचें वतन म्हणजे स्थानिक उत्पन्नाचा दहावा हिस्सा घेण्याचा हक्क; त्या हक्कासंबंधाची रायगडच्या सरदेशमुखांची आख्यायिका प्रस्तुत पोवाड्यांत गायली आहे. या देशमुखांचे वंशज रायगडाजवळ नातें गांवीं राहतात.

“ भोंपळा कापुं रे दादा !
आहे तो जोंवर समदा
तोंवरीच होई सवदा !
कापून मातिचें मोल तया बाजारीं
फांकीस मोकळ्या कोणी रे न विचारी ! ” ३
“ आं ! सटवे ! ” उसळे देशमुखांची स्वारी
“ घेतला भोंपळा ! काय तुझी दरकारी ! ”
“ भोंपळा नाहिं रे दादा
देणार तुशी मी कंदा !
टाकिन त्या परीस समदा
हा गडाखालतीं ! ” म्हणुनी फेंकी ! स्वारीं
“ आं सटवे ! ” आरडली, तैं घुमलीं खोरीं ४
“ आं सटवे ! जेथें वतन, तिथें हा ! थोरी
त्यापरीस दुसरी, काय तरी संसारीं ! ”
बोलोनि उडी हो घेती !
काळाला कवटाळीती !
वतनाच्या पाठीं जाती !
कीर्तिचें मेळविति वतन देशमुखस्वारी
थाटतां हाट मोकाट गडावर भारी ५
“ वाहवा ! वाहवा ! ”—शिवरायाची स्वारी
गर्जली, वृत्त हें कळतां त्या दरबारीं !
“ वाहवा ! देशमुख ? स्वारी
मात ही करितसां भारी !
ये तुमची आम्हां न सरी !

वेंचुनी जीव पुरुषार्थ साधितां चारी !
थाटतां हाट मोकाट जगावरि भारी ! ६

( महाराष्ट्र-साहित्य. )

---

# मर्दानी झांशीवाली

कविः—दुर्गाप्रसाद आ० तिवारी

( १ )

### झांशीच्या कुहरामध्यें

झांशीच्या कुहरामध्यें—सिंहीण निजे घायाळ
गर्जना उठे भंवतालीं—स्वातंत्र्येच्छूंचा काळ
लावाया भाग्य कसाला—तेजस्विनि करि कल्लोळ
बुरुजा बुरुजावर मोर्चे
बांधोनीयां तोफांचे
सजविलें सैन्य शूरांचें
आपणही वेषें सजली—मर्दानी झांशीवाली
यत्कर परिचित झालेले—खड्गाच्या भव्य मुठीस
यत्कर्ण सदा उत्साही—ऐकाया रणघोषास
यन्नेत्र नित्य अनुरागी—आरक्त रणस्थानास
'ह्यू रोज' आंग्ल नरवीर
झांशिच्या तटावर शीर
आपटून झाला जेर
हिंदींत बोलला बोली—मर्दानी झांशीवाली
गर्नाळी कुलपी गोळे—खदिरांगारासम सुटले

पसरली लाल चादर की---अंधाऱ्या रात्रीं गमलें
धुम--घड्धड् धडधड नादें--आकाश भरोनी गेलें
"घनगर्ज" तोफ जैं गर्जे
मोर्चावर गोरे जे जे
त्यांच्यांत पलायन माजे
विजयिनी जयें फुरफुरलीं---मर्दानी झांशीवाली
फितुरीनें केली मात---कलिजास पोंचला हात
दारूच्या कोठारांत---जेजालांची बरसात
किल्ल्यांत आणि नगरांत---मृत्यूचा प्रळयाकांत
शहराला जागोजागीं
लागल्या भयंकर आगी
पाहिली प्रजा हतभागी
वात्सल्यें हृदयीं द्रवली---मर्दानी झांशीवाली
'बोलवा गोशखानाला---बोलवा खुदाबक्साला
गरगंजाच्या बुरुजाला---आणवा कडक बिजलीला
भूतो न भविष्यति ऐशी---उडवा दक्षिण बाजूला
जों तिसरा सुटला वार
तों कर्नल झाला ठार
नंतर चमके तलवार
तलवारीवरही लढली---मर्दानी झांशीवाली
पडघम बिगुलांच्या नादीं---शिंगें कर्णांचे नाद
खालीं वरतीं भरलेला---संग्रामाचा उन्माद
चढत्या ईर्ष्येच्या शब्दीं---चढत्या विजयाचे शब्द

जातीची अबला होती
युद्धकला ठाउक नव्हती
प्रबलांची केली माती
इतिहासीं गाजुन गेली—मर्दानी झांशीवाली
पायजमा पायीं शुभ्र—गहिरा अंगरखा अंगीं
कमरेस दुपेटा भारी—समशेर लटकली जंगी
शोभली शिरीं चंदेरी—सुंदर बत्ती नारिंगी
झांशीच्या सौभाग्याची
मूर्तिमंत लक्ष्मी साची
देवता रणस्थानाची
किल्ल्यांतुन बाहिर आली—मर्दानी झांशीवाली
पहिल्या झेंपेनें घेई—" मिकलीजाना " ची जान
दुसऱ्या उसळीनें घेई—" बोनसफॉक्सा " चे प्राण
"डीका"ला केला शीक—मुरडून हात मारून
" स्टुअर्ट " " लोथ " दोघांनीं
गर्दीत शिड्या लावोनी
चढविलें सैन्य पाहोनी
उफळोनी वाघिण गेली—मर्दानी झांशीवाली
आरक्त उषा ती गमली—आरक्त चंडिका गमली
संतप्त भासली संध्या—संतप्त भासली काली
संक्षुब्ध तिच्या नेत्रांत—क्रोधाची चढली लाली
लखलखाट मार्तंडाचा
चकचकाट पूर्णेंदूचा
दाविला खेळ तेजाचा

रक्तानें शरिरीं न्हाली—मर्दानी झांशीवाली
पुढचा दरवाजा फुटला—बाणीचा तटही गेला
सुंदरिचे हात न पुरले—अष्टदिशा सावरण्याला
कावरीबावरी झाली—शहरांत घोळका घुसला
शत्रूच्या पाठोपाठ
अरबी लढवय्यांसहित
घातली उडी शहरांत
करि कत्तल हिय्येवाली—मर्दानी झांशीवाली.
झाडांच्या मागें कोणी—झुडुपांच्या मागें कोणी
पडवीच्या मागें कोणी—वळचणिच्या मागें कोणी
भीतीनें लपुनी छपुनी—सोडिती बंदुका दुरुनी
चहुंकडून आल्या गोळ्या
त्यांच्याही सुटती गोळ्या
किल्ल्यांत फिरविल्या ढाला
मर्दांना मर्दुन गेली—मर्दानी झांशीवाली.

---

## फेकला तटाहून घोडा

लक्ष्मिचा धैर्यतट अढळ—जरि झांशीचा तट ढळला
तन्निश्चय बुरुज न हाले—एकेक बुरुज जरि पडला
परि वेढ्याच्या पाशांनीं—जखडाया वैरी सजला
काळकंठ जे चिरतील
प्राणास प्राण देतील
घेऊन असे रणशील

फोडाया दुर्गम वेढा—फेकला तटाहुनि घोडा !
मर्दानी बांधुन फेटा—चिलखत चढवी अंगांत
जहरि जंबिया कंबरेला—नंगी समशेर करांत
पाठीस बांधिला पुत्र—कुरवाळुनि वात्सल्यांत
‘ अस्मान फेक ’ जातीच्या—
वेगीं चढल्या छातीच्या
तुरगीं चढलीं त्वेषाच्या

सरकावुन मागें घोडा—फेकला तटाहुन घोडा !
नभ विदारुनी तेजस्वी—ही वीज उडाली काय
भीमाच्या हातामधली—कोसळे गदा कीं काय ?
निखळून स्वर्गदाराची—अर्गलाच पडली काय ?
क्षण भास असा तैं झाला
प्रत्येक पहारेवाला
विस्मित होवोनी ठेला

दाखवीत गगनक्रीडा—फेकला तटाहुन घोडा
दचकले कडाबिनवाले—गोंधळले बंदुकवाले
सरले समशेरीवाले—हटलेही संगिनवाले
उधळोनी सिंहिण गेली—चित्रापरि सारे ठेले
जों मान वळवुनी बघती
तों प्रभावती लक्ष्मी ती
जाय दिक्पथाच्या अंतीं

तो अडला नाहीं थोडा—फेकला तटाहुन घोडा
शत्रूची विजयी टोपी—टापेनें उडवुन दिधली
उतरली मिशी चढलेली—प्रवलांतुन अवला गेली
लेफ्टनंट बौकर धावे—स्वारांची घेउन टोळी

वायूची लहरी चाले
दर्याची लहरी हाले
अधिकाधिक अंतर पडलें

रानांत नवल करि वेडा—फेकला तटाहुन घोडा
देह जरी चाले पुढतीं—प्राण तरी होता पृष्ठीं
चौखूर उधळतां घोडा—तोलून धरी सुत-यष्टी
तो म्हणून "आई !" वदतां—अंतरांत होई कष्टी

सोडिला तिनें दौलतिचा
वाडा तो समृद्धीचा
परि एकच तो जीवाचा

पाठीला घेउन वाडा—फेकला तटाहुन घोडा
सारीत तमःपट आली—ती उषा पूर्व दिक्क्षितिजीं
स्वातंत्र्य-गोल सूर्याचा—सरसरला व्योमामाजी
आवरी जरा लक्ष्मी ती—झांशिच्या सिमेवर वाजी

सोडिला बाळ पाठीचा
घातला घांस प्रेमाचा
दिसला घोडा बौकरचा

ही तेंव्हांची रिपुपीडा—फेकला तटाहुन घोडा
चपला जों चपलाईनें—पाठीस बांधिते बाळ
मारिते टांच घोड्याला—तों बौकर भिडला काळ
मारिला हात उलटून—उलथला दुष्ट घायाळ

वृक्षांच्या शिखरावरुनी
उधळली धूळ पसरोनी
दास्याच्या पायांतूनी

तेंव्हांच तोडिला खोडा—फेकला तटाहुन घोडा
राष्ट्राच्या कल्याणार्थ—कल्याणिनि करि कल्लोळ
ती प्रिय भारतभाग्यार्थ—भागिरथी झाली लोल
आर्यांचे बघुनी हाल—हालवी मही दिग्गोल

मर्दानी झांशीवाली
परवशता पायांखालीं
चिरडून निघे जयशाली

स्वातंत्र्याचा मनिं ओढा—फेकला तटाहुनि घोडा.

( झांशीची संग्रामदेवता )

# रानपांखरा !

कविः--गोपीनाथ गणेश तळवलकर.

रानपांखरा, रोज सकाळीं येसी माझ्या घरा
गाणें गाउन मला उठविसी मित्र जिवाचा खरा !
शरीर निळसर शोभे झालर ठिपक्यांची त्यावरी
सतेज डोळे चमचम करिती जणुं रत्नें, गोजिरीं
पाय चिमुकले, पंख चिमुकले, देह तुझा सानुला !
अफाट आभाळांतुन कैसें उडतां येतें तुला ?
रात्र संपतां डोंगर चढुनी वर येतो भास्कर
तूंही त्याच्यासंगें येसी गात गात सुस्वर !
वाट चालुनी संध्याकाळीं रवि सोडी अंबरा
आणि तूंहि मग पंख उभारुन जासी अपुल्या घरा !
सूर्यासंगें जासी येसी सदा कदा कां बरें ?
शेजारीं आहेत काय रे, परस्परांचीं घरें ?
देह एवढा अपाय कोणी करील तुजला इथें
म्हणून कां तुज रवीबरोबर माय तुझी धाडिते ?
सांगतोस का तिला कसा हा छानदार बंगला,
होते का रे कधीं आठवण माझी सखया तुला ?
तुझ्यासारखें जावें वाटे उडत मजेनें वरी
नेशिल का मज तुझ्या बिऱ्हाडीं बसवुनि पंखांवरी ?
माय तुझी भेटेल, सूर्यही येइल भेटायला
मजाच होइल सख्या पांखरा नेइं एकदां मला !

( दूर्वांकूर )

# गाउं त्यांना आरती

कविः—**यशवंत.**

संगरीं वीराग्रणी जे धैर्यमेरू संकटीं—जन्मले या भारतीं
राष्ट्रचक्रोद्धारणीं कर्णापरी ज्यांना मृती—गाउं त्यांना आरती
कोंदला अंधार मार्गीं खाचखड्डे मातले—तस्करांनीं वेढिलें
संभ्रमीं त्या जाहले कृष्णापरी जे सारथी—गाउं त्यांना आरती
स्वार्थहेतूला दिला संक्षेप ज्यांनीं जीवितीं—तो परार्थीं पाहती
आत्मविस्तारांत ज्यांच्या देशही सामावती—गाउं त्यांना आरती
देश ज्यांचा देव त्याचें दास्य ज्यांचा धर्म हो—दास्यमुक्ति ध्येय हो
आणि मार्कंडेयसे जे जिंकिती काळाप्रती—गाउं त्यांना आरती
देह जावो देह राहो नाहिं ज्यांना तत्क्षिती—लोकसेवा दे रती
आणि सौभद्रापरी देतात जे आत्माहुती—गाउं त्यांना आरती
नेटकें कांहीं घडेना, काय हेतु जीवना—या विचारी मन्मना
बाधितों कीं एवढी होवो तरी रे सत्कृती--गा तयांची आरती

(यशोधन.)

# चान्दरात

कविः—**अनंत काणेकर.**

चान्दरात पसरिते पांढरी माया धरणीवरी;
लागली ओढ कशी अन्तरीं !
हा तालतरू गंभीर शांतता धरी;
लेवुनी सुधेचें वल्कल अंगीं शिरीं,
कुणि शुचिर्भूत मुनि तपा जणूं आचरी !
केंस पिंजुनी उभी निश्चल कोणी वेडीपिशी,
भासते छाया काळी तशी !
जलवलयांचे तरल रुपेरी नूपुर पदिं बांधुनी
खळखळत गुंग झरा नर्तनीं
पाण्ढरा पारवा हूं हूं कोठें करी
क्षण मंद वायुनें लता हले कांपरी,
जणुं शांतताच ही निःश्वसनातें करी !
लपत छपत विधुकिरण खेळती हिरव्या पानांवरी
लागली ओढ कशी अंतरीं !
निळ्या, तांबड्या, हिरवट, पिवळ्या तेजाची सांडणी,
करितसे व्याधाची चांदणी.
बेफाम पसरितें पंख हृदय-पांखरूं
उडुनियां पाहतें अनंत अंबर भरूं !
या इवल्या देहीं कसें तया आवरूं !
चैन पडेना काय करूं—ही आग लागली उरीं
लागली ओढ कशी अन्तरीं !

(अनंत काणेकर)

# पक्ष्याचें जगत्

[ एका इंग्रजी कवितेवरून ]

कविः—श्रीयुत **जयकृष्ण केशव उपाध्ये.**

आलों मी जन्मास जयीं एकें दिवशीं
माझें जग अंडेंच तयीं उडलों भुर्रदिशीं
गोल सानसें निळें घर तों ये दृष्टिसी
तेंच जगत् मम मनोहर
असेल त्याहुनि जगत् कुठें
कल्पनाच मनिं ही न उठे
अंडें फुटलें
तों जग बुडलें
नेत्र उघडले
त्याहुनि विस्तृत पुढें दिसे
वाटे जग तैं तेंच असे १
जगत् नवें तें गवताचें
सुंदर मउशा केंसांचें
बहु कौशल्यें तें रचिलें
मम मातेनें व्यापियलें
मी तैसी मम जननि अशीं
हींच तयांतिल रहिवासी

एकच हिरवा तरू वरा
ह्मटलें, 'होतों अंध खरा' २
जगत् बरेंच विशाल असे
अजवरि कैसें जडे पिसें
किति सुंदर हें जग वाहवा !
रंगहि त्याचा किति हिरवा
हाले मौजेनें डोले
मजही देई बहु झोले
तिथुनि उडालों
नभीं भडकलों
विस्मित झालों
वाटे जग तैं कसें किती
मज नच करवे मुळिंच मिती ! ३

( आनंद )

---

# मर्दांची छाती

कविः-**माधव जूलियन्.**

विनायकाची रसरसलेली कोठें प्रतिभा ती
गावया मर्दांची छाती ?
धर्माचीच प्रतिष्ठा अशी स्त्री तिचियासाठीं
स्फुरावी मर्दांची छाती !
धन रक्षाया, धन वेंचाया प्रिय तत्वासाठीं
धजावी मर्दांची छाती !
हरिबळ त्याला येई घेई जो शिर तळहातीं
पुढारी मर्दांची छाती !
रौरवीं पचत दैन्याच्या
जगती तें जीवन खोटें !
जगण्याची वाटुन लाज
मरुनचि काज हो मोठें !
सत्वास्तव येणें कामीं—
हौतात्म्य दिव्य तें कोठें ?
मात करिल बन्दुकीवरीही वेताची काठी,
पाहिजे मर्दांची छाती ! १
हमरस्त्याला उजळी बिजली, सामसूम सारी
क्वचित् त्या पळती मोटारी.
दूर चाळ वाडींत झोंपली, डुलक्या घे माड,
भोवतीं अन्धकार गाढ.

तों आले चालून दांडगे रात्रिंचर गुंड
मवाली धुंद रक्ततुंड
दरवडा सराफ घरांत
घातला पुष्ट पुंडांनीं,
बांधली मोट शेटाची—
मउ तसा स्थूल तो प्राणी !
हतबुद्ध उभी, रडवेना,
कोपऱ्यामधें शेटाणी—
जिकडे साहस तिकडे श्रीयश हीं होउन जातीं,
पाहिजे मर्दाची छाती ! २
जागृत झाल्या शेजाऱ्यांना ग्रासी तंव भीति —
काळजें कबूतरांचीं तीं !
विश्वासुन दुसऱ्यावर अपुलें रक्षण टाकून
पहुडती तोंडें झाकून—
दागदागिने रोकड सगळी हो तिकडे गोळी,
जाय त्या अबलेवर डोळा.
धमकीचा सुटुन हुकूम
थरथरा कांपते बाला
दागिना बघे काढाया
पायिंचा निघेना वाळा;
तों पुढें जाहला एक
जणुं पायच तोडायाला—

वाडीबाहिर करूं लागले तमासगिर दाटी—
पाहिजे मर्दांची छाती! ॥ ३ ॥

तों धांवे नव तरुण मराठी—अबलांचा वाली,
सतीला पाठीशीं घाली.
पत्ता कुठला? वेत भिणाभिणे त्याचा खोलींत
खलांना मागें चेपीत.
दूर दिसे तों उजेड, गडबड ये कांहीं कानीं,
ठेपली आणि आणिबाणी.
कडकडाडली तों गोळी
तो वीर तळीं कोसळला,
बोचकें उचलुनी पुंड
एकेक तमीं मावळला;
वांचली मराठी अब्रू,
वांचली संकटीं अबला!
रक्तपात का अरुणोदय तो? मृति न, चेतना ती!
अहा ती मर्दांची छाती!

---

# मातेस्तव व्हा सिद्ध मराया

कविः—भास्कर रामचंद्र तांबे.

( राग—मालकंस )

मरणांत खरोखर जग जगतें ! । अधि मरण अमरपण ये मग तें ! धृ०

अनंत मरणें अधीं मरावीं,
स्वातंत्र्याची आस धरावी,
मारिल मरणाचि मरणा भावी,
मग चिरंजीवपण ये बघ तें ? । मरणांत खरोखर जग जगतें । १

सर्वस्वाचें दान अधीं करि,
सर्वस्वाचि ये स्वयें तुझ्या घरि,
सर्वस्वाचा यज्ञ करीं तरि,
रे स्वयें सैल बंधन पडतें ! । मरणांत खरोखर जग जगतें ! २

स्वातंत्र्याचा एकच ठावा
केवळ यज्ञच मजला ठावा !
बद्ध जनांचा यज्ञ विसावा !
यज्ञाविण कांहीं का मिळतें ! । मरणांत खरोखर जग जगतें ! ३

सीतासति यज्ञीं दे निज बळि,
उजळुनि ये सोन्याची पुतळी !
बळी देउनी बळी हो बळी,
यज्ञांत विश्व बघ धगधगतें ! । मरणांत खरोखर जग जगतें ! ४

यज्ञ करा स्वातंत्र्य मिळाया
सर्वस्वाचें दान करा या,
मातेस्तव व्हा सिद्ध मराया !
बडबडुनि मागुनी का मिळतें ? । मरणांत खरोखर जग जगतें ! ५

( मातृ-गीतांजली. )

# " प्रेमानें ध्याऊं "

कविः--विठ्ठल दत्तात्रय घाटे.

प्रेमानें ध्याऊं ! । प्रभुजी ॥ धृ० ॥

आधी येवो, व्याधी येवो,
मन जनतापें तप्तहि होवो,
कोठें जावो, कोठें नेवो,

संतत तुज सेवूं । प्रभुजी प्रेमानें ध्याऊं ! ॥ १ ॥

तेज असो वा तिमिर असो वा,
उषा असो संध्याहि असो वा,
कांहिं असो वा कांहिं नसो वा,

शून्यीं तुज पाहूं । प्रभुजी ! प्रेमानें ध्याऊं ! ॥ २ ॥

तरल धनाच्या सुखलास्यांत
मधुर फुलांच्या वा हास्यांत,
शांत जलाच्या वर्षावांत,

छबी तुझी पाहूं । प्रभुजी ! प्रेमानें ध्याऊं ! ॥ ३ ॥

मागें पुढती स्थिती कोणती ?
कशास काथ्याकूट अम्हां ती
नहि भक्तांची, शास्त्र्यांची ती !

आम्ही तुज गाऊं ! प्रभुजी ! प्रेमानें ध्याऊं ! ॥ ४ ॥

तर्क वितर्का सोडुनि देऊं
एकभाव निश्चल मनिं ठेवूं
जिवंत प्रेमामध्यें पोहूं,
संतत तुज वाहूं ! प्रभुजी ? प्रेमानें ध्याऊं ! ॥ ५ ॥

सृष्टीचे पडदे सारूं दे !
गूढ सुखें आम्हा भोगूं दे !
दाहि दिशां प्रेमा खेळूं दे !
भक्ता दे गाऊं ! प्रभुजी ! प्रेमानें ध्याऊं ! ॥ ३ ॥

( मधु-माधव. )

---

## टीपा

पृ. ४ **प्रियकर हिंदिस्तान !**—स्वदेशास, 'हिंदुस्तान' या त्याच्या रूढ नांवाऐवजीं त्यांतील हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, ज्यू इ. निरनिराळ्या धर्मांच्या लोकांचें परस्परांशीं असलेलें भ्रातृभावाचें नातें सूचित करणाऱ्या 'हिंदिस्तान' या नवीन नांवानें कवीनें संबोधिलें आहे. वास्तविक इस्लाम, झर्थुश्त्री, ख्रिस्ती वगैरे अहिंदु धर्मांशीं हिंदुस्तान आजवर कधींहि असहिष्णु झाला नाहीं.

पृ. ८ **हतभागिनी**—ही कविता म्हणजे दुर्दैवी हिंदमातेवर रचलेलें रूपक आहे.

पृ. १९ **पांखरा येशिल का परतून ?**—कै. बालकवि, त्र्यंबक बापूजी ठोंबरे, यांजवर रे. टिळकांचें पुत्रवत् प्रेम होतें. टिळक अहमदनगरला राहत व तेथेंच कांहीं दिवस बालकवीहि होते. पुढें बालकवींना तेथून दुसरीकडे जावें लागलें, त्या प्रसंगीं त्यांना उद्देशून टिळकांनीं ही गोड कविता लिहिली. कर्ती-सवरतीं झालेलीं मुलें अपरिहार्य कारणांमुळें दूर जातांना आईबापांच्या मनांत जो स्वार्थत्यागी वात्सल्यभाव उचंबळून येतो, तो यांत व्यक्त झाला असून, त्यांतलि पांखराचें रूपक बालकवींच्या काव्यमय जीवितार्चेहि उत्कृष्ट निदर्शक आहे.

पृ. २३ **संध्यातारक**--दिवस मावळल्यानंतर व रात्र पसरूं लागण्यापूर्वीं, म्हणजे संधिप्रकाशाच्यावेळीं, आकाशांत क्षितिजाच्या कडेला कांहीं तारे थोडा वेळ चमकून मग दिसेनासे होतात. या साध्या सृष्टिचमत्कारावर कवीनें या कवितेंतील सुंदर कल्पनांची उभारणी केली आहे.

पृ. २९ **जळदेवतेचें गाणें**—सृष्टींतील कांहीं सुंदर आंदोलनदृश्यांना दोले कल्पून त्यांवर जळदेवता आपल्या जळबाळास झोले देतांना हें गाणें म्हणत आहे.

पृ. ३० **अनुचर**—शिवाजीमहाराजांच्या या अनुचरास आपलें 'राजसंन्यास' नाटक अर्पण करतांना कै. राम गणेश गडकरी लिहितात,

" इतिहास छातीला हात लावून पुढील कथा सांगतो आहे, तेव्हां विश्वासानें ती मुकाट ऐकून घ्यायला हवीच. थोरल्या छत्रपतींचा एक आवडता कुत्रा होता. हें ' समर्थाघरींचें श्वान ' खरोखरीच सर्वांनां मान देण्यासारखें होतें. हा इमानी जीव आबासाहेबांना कधींहि विसंबत नसे. अखेर प्रभूचें शुभावसान झाल्याबरोबर

त्या मुक्या इमानानेंहि त्यांना स्वर्गापर्यंत सोबत केली. आज रायगडावर त्याची भाग्यशाली समाध राजाच्या समाधीशेजारी मांडिला मांडी लावून बसलेली तिन्ही लोक डोळ्यांनीं पहात आहेत."

पृ. ३४ **शिपाइदादा नका !**—न्यायनियमांचें उल्लंघन करणाऱ्या गुन्हेगारांसंबंधीं केवळ तिरस्काराची भावना न बाळगतां, त्यांजकडून गुन्हा घडणारीं कारणेंहि सहानुकंपापूर्वक लक्षांत घेणें जरूर आहे, या तत्त्वाची ही कविता आठवण करून देते.

या कवितेंत आलेल्या अपरिचित कुणबाऊ शब्दांचा अर्थ पुढीलप्रमाणें:— वाइच—थोडेंसें, कालपूनचा—कालपासूनचा, चुका—एक आंवट पालेभाजी, सुका—तंबाखू, लुका—रुका म्हणजे एक पै किंमतीचें नाणें, उलिसा—थोडासा, चिलडी—लहान लुगडें, भातुका—खाऊ.

पृ. ३८ **मी तुझी मावशी तुला न्यावया आलें !**—सासुरवाशीण मुलीची माहेरीं जाण्याबद्दलची मुकी अधीरता या कवितेंत वर्णिली आहे. हिंदूंतील ब्राह्मणादि कांहीं जातींमध्यें मुलीचा बाप किंवा भाऊ बहुधा मूळ म्हणून मुलीच्या सासरीं जाण्याचा प्रघात आहे. पण थोड्या जातींमध्यें मावशी किंवा असेच इतर नातेवाईकहि मुलीला आणावयाला जातात. अशाच एका मुलीला माहेरीं न्यावयाला आलेल्या तिच्या मावशीला पाहून कवयित्रींनीं ही कविता लिहिली.

पृ. ४१ **निरोप द्यावा आतां**—हें करुणगीत कै. गडकऱ्यानीं आपल्या पुण्यप्रभाव नाटकांतील कालिंदीच्या तोंडीं घातलें आहे. अर्थात् आपल्या मृत तान्ह्या मुलाला मूठमाती देण्यासाठीं स्मशानांत गेलेल्या एका मातेचे हे शोकोद्गार आहेत.

पृ. ६३ **नारंगीचें लग्न**—या जानपद गाण्यांत कांहीं कुणबाऊ भाषेंतील झाडांची व वनस्पतींचीं अपरिचित नांवें आहेत; त्यांचे परिचित प्रतिशब्द पुढीलप्रमाणें:—नागन—पानवेल. दाडिंब—डाळिंब. विहडा—वेहडा. डवना—दवणा. परित—पारिजातक. दांडे—देंठ.

**समता**—प्रत्येक देशांत समाजांतील आर्थिक विषमतेचे दुष्परिणाम सध्यां दिवसेंदिवस जास्त स्पष्ट होऊं लागले आहेत. अशा या काळीं बालपिढीच्या

मनांतसुद्धां देशांतील श्रमोपजीवि गरीब वर्गासंबंधीं सहानुभूतीचें बीं रुजविणें भावी राष्ट्रहिताला पोषक आहे, व या दृष्टीनें ही कविता उपयुक्त ठरेल.

या कवितेंतील ' मूर्ती फोडिन ' या शब्दाचा वाच्यार्थ घेणें चुकीचें होईल. 'मूर्ती' म्हणजे समाजांतील नालायक परंतु पूजास्थान होऊन बसलेलीं बडीं धेंडें. सामान्य जनतेच्या हितासाठीं त्यांचीहि कदर बाळगणार नाहीं, हाच त्यांतील अभिप्रेत आशय आहे.

पृ. ७१ **शिवकालीन मेटकऱ्यांचें गाणें**–शिवकालीन मराठ्यांचा एक महत्त्वाचा लढाऊ गुण म्हणजे त्यांचा गनिमी कावा. या गुणाच्या जोरावरच संख्येनें व लष्करी साधनसामुग्रीनें अनेक पटींनें श्रेष्ठ असलेल्या मुसलमान शत्रूंना त्यांनीं जेरीस आणलें. नुसत्या गोफणीच्या गुंड्यांनीं दुस्मानांचीं नरडीं भेदूं, असा या गाण्यांतील मेटकऱ्यांचा आवेशयुक्त आत्मविश्वास मराठ्यांच्या या गनिमी काव्याचें सामर्थ्यच व्यक्त करीत आहे.

मेट म्हणजे चौकी व मेटकरी म्हणजे चौकीदार. जुन्या काळीं किल्ल्याच्या पायथ्याशीं व आजूबाजूस शत्रूंवर नजर राखण्यासाठीं या मेटकऱ्यांच्या टोळ्या ठेवण्यांत येत.

पृ. ७३ **जिवबादादा बक्षी**–अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत मराठेशाहीचा उत्कर्ष घडून येण्यास ज्यांची कर्तबगारी व शौर्य कारण झालें, अशा थोड्या स्मरणीय ऐतिहासिक व्यक्तींमध्यें जिवबादादा बक्षी यांची प्रामुख्यानें गणना केली पाहिजे. पण महाराष्ट्रांतील आजच्या सर्वसाधारण इतिहासवाचकांस व कित्येक इतिहासलेखकांसहि या स्वराज्यकालीन वीराची माहिती असलेली दिसून येत नाहीं !

गोमंतकांतील केरीं नांवाच्या गांवीं इ. स. १७४० मध्यें जिवबादादा केरकर यांचा जन्म झाला. लहानपणापासून ते शरीरानें धष्टपुष्ट व मजबूत होते व घोड्यावर बसणें, बंदूक मारणें, पोहणें, वल्हवणें, इ. शारीरिक श्रमांची व मर्दानी खेळांची त्यांना फार आवड असे. आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षीं देशांतरीं जाऊन नशीब काढावें या हेतूनें ते घरून निघाले, ते प्रथम

कोल्हापुरास येऊन कांहीं दिवस राहिले, व या ठिकाणीं त्यांनीं भाला, तरवार, दांडपट्टा, बोथाटी, इ. शस्त्रास्त्रांचें शिपाइगिरीच्या पेशाला आवश्यक असलेलें शिक्षण मिळविलें. नंतर ते पुण्याला आले. तेथें त्यांना आपल्या अंगचे शौर्यादि गुण प्रकट करण्यास योग्य क्षेत्र मिळून शेवटीं महादजी शिंद्यांनीं त्यांना आपली बक्षिगिरी म्हणजे सेनापतीपद दिलें. येथूनपुढें त्यांच्या खऱ्या कर्तृत्वास सुरुवात झाली. महादजींची सबंध कारकीर्द व नंतर दौलतराव गादी-वर आल्यानंतरचीं दोनतीन वर्षें, या एवढ्या दीर्घ काळांत शत्रूबरोबर झालेल्या शिंद्यांच्या बहुतेक सर्व लढायांचें नेतृत्व जिवबादादांकडेच होतें. कारण लंगडेपणाच्या शारीरिक व्यंगामुळें महादजींस बहुधा लढाईंत जातीनें भाग घेणें शक्य नसे. त्याचप्रमाणें दौलतरावहि गादीवर आल्यावेळीं अल्पवयी होते. अशा रीतीनें रोहिले, जाट, रजपूत, इंग्रज इत्यादि प्रबळ शत्रूंशीं जिव-बादादांस वारंवार अनेक युद्धप्रसंग करावे लागले, पण त्यांत त्यांना एकदांहि अपेश आलें नाहीं, यावरून त्यांची ‘ सदाविजयी ’ अशी त्या काळीं ख्याती झाली होती. महादजींच्या कारकीर्दींत शिंदेशाहीचा जो अत्यंत विस्तार होऊन ती मराठ्यांच्या सत्तेचा मुख्य आधारस्तंभ बनली, तिचें जितकें श्रेय महादजींच्या शहाणपणाच्या राज्यकारभारास तितकेंच जिवबादादांच्या पराक्रमासहि देणें उचित आहे. एकजूट होऊन आलेल्या अनेक रजपूत राजांविरुद्ध पाटणा व मेरठ येथील संग्रामांत त्यांनीं मिळवलेले विजय, दिल्लीच्या शहाअलम बादशहास गांज-णाऱ्या गुलाम कादरचें पारिपात्य करून बादशहाकडून पेशव्यांसाठीं मिळवलेलीं वजिरीचीं वस्त्रें, व खर्ड्याच्या लढाईंतील त्यांची मर्दुमकी, हे जिवबादादांच्या चरित्रांतील विशेष महत्त्वाचे प्रसंग होत.

रा. राजाध्यक्ष यांनीं जुन्या ऐतिहासिक कागदपत्रांनिशीं प्रसिद्ध केलेल्या जिवबादादांच्या विस्तृत चरित्रावरून मराठेशाहींतील त्यांच्या कामगिरीची कोणालाहि नीट कल्पना येईल.

यदुवंशविलासनृपांनीं—देवगिरीच्या यादव किंवा जाधव नामक राजांनीं. शिवाजी महाराजांचा आजा लखुजी जाधव ऊर्फ लक्ष्मणदेव हा या देवगिरीकर यादवांच्या वंशांतला होता. जरिपटका हें ध्वजचिन्ह मूळ या यादवांचें. तें पुढें

आपल्या मातुल वंशापासून शिवाजीनें स्वीकारलें, व म्हणून यादववंशांतील राजांचा हा उल्लेख कवीनें केलेला आहे.

द्रविड राजांना--दक्षिण हिंदुस्थानांत जसजसें दक्षिणेकडे जावें, तसतसें आर्य किंवा आर्यमिश्रित लोकांचें प्रमाण कमी कमी होत जातें. या द्रविड लोकांच्या बहुतेक राजांना देवगिरीच्या यादवांनीं जिंकून आपलें मांडलिक बनविलें होतें.

हिरवे डोळे—मत्सरी डोळे.

पृ. ८४ **गोकलखां**—बापूजी गणेश गोखले, दुसऱ्या बाजींचे सेनापती. बापू गोखल्यांपाशीं जे अरब होते ते त्यांस गोकलखां असें त्यांच्या शौर्यावरून म्हणत.

पृ. ९० **हक्काची फांक**—वतनाचा अनावर लोभ हा मराठ्यांचा एक स्वभावविशेष आहे. सूर्याजी पिसाळासारख्या देशद्रोह्यांच्या नीच कृत्याचे डाग निरनिराळ्या काळीं मराठ्यांच्या इतिहासाला लागलेले आहेत, त्यांचें कारण हें वतनाचें वेडच ! व म्हणून देशासाठीं वतनावर पाणी सोडणाऱ्या खंडोजी चिटणीसासारख्याचें इतिहासांतील एकादें दुसरें उदाहरण विशेष खुलून दिसतें. मराठ्यांच्या या राष्ट्रीय अवगुणांचें उपरोधिक दर्शक म्हणून या कवितेंत वर्णिलेल्या दंतकथेंतील अतिशयोक्तीहि अर्थपूर्ण आहे.

पृ. १०१ **चांदरात-व्याधाची चांदणी**—आकाशांत मृगनक्षत्राचा पुंज किंवा भरतपुंज या नांवानें ओळखला जाणारा जो तारकपुंज दिसतो त्याच्या खालीं हा व्याधाचा तारा आहे. यास लुब्धक असेंही दुसरें नांव आहे. सर्व ताऱ्यांत अत्यंत तेजस्वी व शोभिवंत असा हा तारा असून तांबड्या, निळ्या, हिरव्या पिवळ्या अशा निरनिराळ्या रंगांच्या एकामागून एक बदलत्या छटा याच्यावर दिसत असतात. मृगपुंजाच्या पोटांतील तीन लहान तारे व हा तारा एकाच दिशेमध्यें असल्यामुळें ते तारे म्हणजे मृगाच्या पोटांत या व्याधानें मारलेला बाण आहे, अशी कल्पना गृहीत धरून या ताऱ्यास हें नांव देण्यांत आलेलें आहे.

पृ. १०३ **मर्दाची छाती**--कै. प्रभाकर बाळकृष्ण सुळे या एका आधुनिक तरुण वीराकडून घडलेला धीरोदात्त आत्मयज्ञ, हा या कवनाचा विषय आहे.

गतकालीन व्यक्तींपेक्षां, आपल्याच परिस्थितींतील वर्तमानकालीन व्यक्तीं-कडून घडलेलीं शूर कृत्यांचीं उदाहरणें कोणासहि जास्ती स्फूर्तिदायक होतात. पण दुर्दैवानें देशांतील क्षात्रतेज व मर्दानी गुण हीं सध्यां बऱ्याच प्रमाणांत लुप्त झालीं असल्यामुळें चालू काळांतील वीरांचीं कवनें लिहिण्याचा व गाण्याचा सुप्रसंग आपल्याला क्वचितच येतो. या दोन्ही गोष्टी लक्ष्यांत घेतां या कवितेला एक प्रकारें विशेष महत्त्व आहे.

प्रभाकराचा जन्म सन १८९७ मध्यें झाला. लहानपणींच त्यांचे आईबाप वारले व पुढें त्यांचे वडील बंधु कै. जयराम सुळे यांच्या सांपत्तिक अडचणीमुळें वयाच्या बाराव्या वर्षींच त्यांचें शिक्षण खुंटुन त्यांस नोकरी करणें भाग पडलें. १९२१ सालपर्यंतच्या त्यांच्या या जीवनक्रमांत अलौकिक असें कांहींच नव्हतें, यांत आश्चर्य नाहीं.

ता. ५ मार्च १९२१ रोजीं माटुंगा (मुंबई) येथें रात्रीं सुळेबंधु आपल्या घरीं झोंपीं गेले असतां सुमारें दोन वाजतां शेजारच्या चाळींतील एका स्त्रीची किंकाळी त्यांना ऐकूं आली. त्या असहाय्य अबलेचा दीन हंबरडा त्या चाळींतील आणखीहि शेंदोनशें पुरुषांच्या कानांवर त्या पूर्वींच गेला होता, पण तिच्या रक्षणाकरितां धांवून जाण्याचें धैर्य त्यांपैकीं कोणाच्याहि अंगीं नव्हतें. चाळींतील एका मारवाड्याच्या दुकानावर पंधरावीस सशस्त्र पठाणांचा दरवडा पडला होता. मारवाडी बाहेरगांवीं गेला होता व त्याची पत्नी एकटीच घरीं होती. दुकान लुटण्यांत व अमानुष प्रकारांनीं तिच्या अंगावरील दागिने मिळवण्यांत पठाण गुंतले होते. असा हा प्रसंग पाहून सुळेबंधूंनीं तत्काळ आपल्या खोलींतील वेताच्या काठ्या उचलल्या,—कारण वेताच्या काठ्या हींच आह्मां हिंदी लोकांचीं सांप्रतचीं शस्त्रास्त्रें !—व त्या अबलेच्या रक्षणार्थ त्यांनीं धांव घेतली !—पायांतील वाळा काढून घेण्यासाठीं ते दुष्ट तिच्या पायावर शस्त्रप्रहार करण्याच्या बेतांत होते, तोंच सुळेबंधु तेथें पोहोंचून त्यांनीं तिला पाठीशीं घातलें, व लगेच आप-ल्यावर उलटलेल्या पठाणांच्या शस्त्रांचे आघात सहन करीत हातांतील काठ्यांची

त्या मर्दांनीं त्यांच्यावर झोड उठवली ! एकामागून एक वार होताहेत व सर्व शरीरांतून रक्तप्रवाह वाहातो आहे, अशा स्थितींतहि त्यांनीं शेवटपर्यंत त्या सर्व पठाणांशीं टक्कर दिली, व अखेरीस त्यांना मागता पाय घ्यायला लावला त्या दोघांनीं निधड्या छातीनें केलेल्या या प्रतिकारामुळें थोड्या वेळानें पठाण मारवाड्याचें दुकान सोडून निघून गेले, पण जातां जातां त्यांपैकीं एकानें दुरून गोळी झाडून प्रभाकराचा बळी घेतला ! अशारीतीनें या बंधुद्वयापैकीं एकानें आपल्या प्राणांची आहुती देऊन व दुसऱ्यानें आपलें रक्त सांडून, त्या स्त्रीच्या अब्रूचें व जीविताचें त्या दिवशीं रक्षण केलें !

पुढें हा दरवडा घालणाऱ्या पठाणांस पकडून त्यांस शिक्षा देण्यांत आली. दरवड्याची केस हायकोर्टांत चालली असतां, जस्टिस किंकेड यांनीं निवाडा देतांना सुळेबंधूंच्या मर्दुमकीबद्दल व साहसाबद्दल अत्यंत प्रशंसापर उद्गार काढले. सरकारनेंहि रा. जयराम सुळे यांस एक प्रशंसापत्र व ५०० रु. चें अल्प पारितोषक देऊन त्यांचा गौरव केला. वीर प्रभाकराच्या स्मरणार्थ एक सार्वजनिक निधी उभारण्यांत आला असून, प्रभाकराप्रमाणें परजीवितरक्षणार्थ शौर्याचें किंवा साहसाचें कृत्य करणाऱ्या कोणाहि महाराष्ट्रियास दरवर्षी त्यांतून एक पारितोषक देण्यांत येतें.

पृ. ९ **विनायकाची**—हा उल्लेख मराठींतील आधुनिक शाहीर कै. विनायक जनार्दन करंदीकर यांना उद्देशून आहे.

---


# प्रथम चरणांची सूची


अतां एक आस उरे कीं विभो ! तुला ध्यावें ... ७७
अन्तर मम विकसित करिं हे परात्परा ! ... ... १
अवेळ तरिही बोल कोकिळे अवेळ तरिही बोल ... ३२
अश्रुपात हा कशास करिसी काढुन रडसी गळा ... १७
'आई' म्हणोन कोणी आईस हांक मारी ... ... ४५
आधीं भाकर दरएकाला नंतर श्रीमंता पोळी ... ६१
आनंदी आनंद गडे ... ... ... ... १६
आनंदकंद ऐसा हा हिंद देश माझा ... ... २०
आम्हि राज्यें बनवल नव ... ... ... ६२
आम्ही रांगड गडकरी मेटकरी ... ... ... ७१
उगवुनि आला पूर्वेला चांदोवा ... ... ... ६४
उघडिं नयन रम्य उषा हंसत हंसत आली ... १२
कुणि नाहीं ग कुणि नाहीं ... ... ... ११
कोठचा शिवाजी राजा ... ... .. ४९
क्षणोक्षणिं पडे, उठे परि वळे, उडे बापडी ... .. ५५
खबरदार ! जर टांच मारुनी जाल पुढें चिंधड्या ... ८०
गडबड घाई जगांत चाले आळस डुलक्या देतो पण .. १३
गडावर जाऊं, शिवराजदर्शना लाहूं ... .. ९
गाई घरा आल्या ... ... ... .. ६६
गुणि बाळ असा जागसि कां रे बांयां ... .. ४८
चांदरात पसरिते पांढरी माया ... ... .. १०१
चांफा बोलेना चांफा चालेना ... ... .. ५
जातीच्या सुमनापरी धवल जें, सद्गंध जें कोंवळें .. ३
जांव जांवळी विचार करिती नारंगीचें करूं लगन .. ६२

जो जो जळवाळा ... .. ... ... २९
जो जो जो जोरे ... ... ... ... ७८
झांशीच्या कुहरामध्यें ... ... ... ... ९२
झिम्मा खेळूं ये झिम्मा नाचूं ये ... ... ... ६०
तडित् कडाडे उपजे काळ्याकभिन्न मेघोदरीं ... ४४
तळहातीं टेकुनी ही स्वशिरातें वैसली ... ... ८
थाटला हाट मोकाट गडावर भारी ... ... ९०
दिनरजनींच्या हृदयावरलें ... ... ... २३
[illegible]भागी हा देश होवो मंगलमय ... ... ... ८७
नमनें वाहुनि स्तवनें उधळा जयजयकार करा ... २
निजल्या तान्ह्यावरी ... ... ... ... १६
निरोप द्यावा आतां वाळा टाकुनि जाते माता ... ४१
परवशता पाश दैवें ज्याच्या गळां लागला ... ... ३६
पांखरा येशिल का परतून ... ... ... १९
पाळणा हवा मज वाळपणीं जो होता ... ... ५१
पावित्र्याचें मंदिर तूं ... ... ... ... २२
प्रियकर हिंदिस्तान आमुचा प्रियकर हिंदिस्तान ... ४
प्रेमानें ध्यावूं, प्रभुजी प्रेमानें ध्यावूं ... ... १०७
फूलपांखरूं मजा करी ... ... ... ... ४७
वाळ कुणी, संध्याकाळीं रमे गुणी ... ... ... ६७
वोलत कां नाहीं, झालें काय तुला वाई ... ... २८
वोल वाई वोल ग ... ... ... ... ५४
भयशून्य जेथें, चित्त मानवाचें ... ... ... ७०
भारता तार या कालिं कालिं हरि वाजिव गीता मुरली ८८
भीमकवाळा ती वेल्हाळा टाकुनि गोपाळा ... ... ४०
मंगल देशा पवित्र देशा महाराष्ट्र देशा ... ... ७
मरणांत खरोखर जग जगतें ... ... ... १०६

महत्त्व भारी आहे या पृथ्वीचें ... ... . १४
या वाई या, बघा बघा कशि माझि बसलि बया . २९
रवि तळपे डोईवर ... ... ... . ८३
रानपांखरा रोज सकाळीं येसी माझ्या घरा ... . ९९
रूप तुझें गोजिरवाणें ... ... ... . ७९
लहानसें होतें बीज ... ... ... . ३७
वसंत ज्या म्हणती सकलजन वसंत ज्या म्हणती . ४२
विस्तीर्ण वडाच्या दगडी पारावरी ... . २५
विनायकाची रसरसलेली कोठें प्रतिभा ती ... . १०३
शिपाईदादा नका नका हो शिपाईदादा नका . ३४
शिवराजे निजधामा गेले ... ... . ३०
शिवरायाचा सिंह सिंहगडिं पडला समरांगणीं . ५६
समशेरीला समशेर ... ... ... . ७३
सावध सावध सावध माझ्या गोजिरवाण्या फुला . ४३
सांगा माझें नांव गड्यांनो सांगा माझें नांव ... . ८७
संगरीं वीराग्रणीं जे धैर्यमेरू संकटीं ... . १००
हा कोण इथें पडलेला ... ... ... . ८४
हिरवीं शेतें, हिरवीं कुरणें ... ... . ३९
ही भरली घागर तुझ्या शिरावर बाळे ... . ३८
हे चिमण्या चंद्रा पाहुनि तुजला खचतो माझा धीर . ५२
होता डोंगर पायथ्यास पडला धोंडा भला थोरला . ३५

श्रेष्ठ साहित्य–कोविदांच्या कसोटीस उतरलेला
व अत्यंत लोकप्रिय झालेला मराठींतील एक
अभिनव स्वरूपाचा कथासंग्रह !




एक लघुकादंबरी व सात गोष्टी ! पृ. सं. ३६०
दहा दोनरंगी चित्रें ! कापडी बाइंडिंग, किं. २ रु.

या पुस्तकाला श्री. कमलादेवी चट्टोपाध्याय यांनीं लिहिलेली ओजस्वी व विवेचक अशी १९ पृष्ठांची विस्तृत इंग्रजी प्रस्तावना (मराठी भाषांतरासह) जोडली आहे !

या प्रस्तावनेंत श्री. कमलादेवी लिहितात :—

"What is most striking about his work is its originality and freshness. Like a true child of the Renaissance he has struck out a new path for himself and is boldly treading it, hoping to reach a destiny or rather carve out a new destiny for himself...."

इतर विद्वानांचे अभिप्राय :—

"सुखठणकरांनीं आपल्या कथांत प्रसंगवैशिष्ट्य आणि स्थान-वैशिष्ट्य हीं फारच चांगल्या तऱ्हेनें आणलीं आहेत. आणि त्या दृष्टींनीं मराठींत या कथांस आज तरी अतुल्यत्व आहे असें कबूल केलें पाहिजे." ( **डॉ. श्री. व्यं. केतकरकृत** 'यशवंत'मधील परीक्षण.)

" सह्याद्रीच्या पायथ्याशीं ' हें पुस्तक म्हणजे कशावशा गोळा केलेल्या आणि दोन पुठ्यांच्यामध्यें कोंबलेल्या विस्कळित गोष्टींचा संग्रह नसून आजकालच्या गोमंतकाच्या काव्यपूर्ण जीवनाचे आठ पैलू आहेत. पदोपदीं लेखकानें आपली उच्च अभिरुची आणि श्रेष्ठ कलेचा आत्मा जो संयम त्या दोहोंचा परिचय करून दिला आहे."

( **आचार्य काकासाहेब कालेलकरकृत**

' चित्रमयजगत् ' मधील परीक्षण. )

....मानसशास्त्रदृष्ट्या संवेदना कशा वर्णाव्या व भावनांचा परिपोष कसा रंगवावा हें श्री. सुखठणकर चांगलें जाणतांना दिसतात. त्यांच्या गोष्टी वाचून हृदयांतील अत्यंत सूक्ष्म तारा आपोआप हलूं लागतात व डोळ्यांतून नकळत अश्रुधाराहि सुरू होतात....एक प्रकारची गंभीर शांततेची पार्श्वभूमी सर्व प्रसंगांच्या मागें सारखी उभी आहे."

( **श्री. शेजवलकरकृत** 'प्रगती'तील परीक्षण. )